



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २८४ * नांदेड * रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## एकनाथ शिंदेंकडून रामदास कदमांना सूचना, मनोज जरांगे पाटलांविषयी बोलू नका, महायुतीतील तणावानंतर हालचाली



**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ५०० कोटींच्या देवाण–घेवाणाची ऑडिओ क्लिप ऐकवल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून महायुतीमध्येही तणावाचे वातावरण निर्माण झालं आहे. त्यातच, शिवसेना नेते रामदास कदम यांनी पत्रकार परिषद घेऊन थेट भाजप नेत्यांवर आरोप केले आहेत. विशेष म्हणजे, आमदार प्रसाद लाड आणि मनोज जरांगे पाटील यांचा फोटो दाखवत ही मैत्री असल्याचं त्यांनी म्हटलं. तसेच, भाजपाकडून मित्रपक्षाला दाबलं जात असल्याचंही त्यांनी म्हटलं होतं. त्यामुळे, भाजप नेतेही नाराज झाले आहेत. आता, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून रामदास कदमांना न बोलण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मनोज जरांगे पाटील यांनी ऑडिओ क्लिप समोर आणल्यानंतर भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये आरोप–प्रत्यारोपांना जोर आला आहे. मंत्री उदय सामंत यांनी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, या प्रकरणावरून राजकीय वातावरण तापलेलं असतानाच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रामदास कदम यांना या विषयावर आणखी भाष्य न करण्याची स्पष्ट सूचना दिल्याची माहिती समोर येत आहे. या विषयावर आता बोलणं थांबवा, अशी भूमिका एकनाथ शिंदे यांनी घेतल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे, या प्रकरणावरून सुरू असलेल्या राजकीय वादाला पूर्णविराम देण्याचा शिंदे यांचा प्रयत्न आहे का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. दरम्यान, जरांगे पाटील यांच्या ऑडिओ क्लिपनंतर भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेतील आरोप–प्रत्यारोपांवर आता काय पडदा पडतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

मनोज जरांगे पाटलांच्या क्लिपवरील टीकेनंतर शिवसेना नेते रामदास कदम भाजपच्या निशाण्यावर असताना, पक्षातील नेते मात्र त्यांच्या पाठीशी नाहीत, अशी परिस्थिती दिसून येत आहे. भाजप आमदार प्रसाद लाड, प्रवीण दरेकर यांनी टिका केल्यानंतर मंत्री उदय सामंत सोडले तर शिवसेनेतून एकाही नेत्याने भाजप आमदारांना प्रतिउत्तर केले नाही. विशेष म्हणजे, रामदास कदमांनी मोदींना पत्र लिहिलं असून मित्र पक्षाकडून होत असलेल्या कटाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. त्यानंतर, पक्षातील नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, जरांगे पाटलांनी ऐकवलेल्या क्लिपच्या चौकशीची मागणी केली.

## पुढील आठवड्यात राज्यात पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात सध्या दुष्काळ आहे. रबी हंगामातील पिकांसाठी एखादा चांगला पाऊस पडावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. यातच आता पुढच्या काही दिवसांत महाराष्ट्रात पाऊस होण्याची शक्यता वर्तविली आहे.

सध्या बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. या क्षेत्रात पुढच्या दिवसात वाढ होणार आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस होऊ शकतो. कमी दाबाचे हे क्षेत्र वाढल्यास याचे चक्रीवादळातही रुपांतर होऊ शकते. याच चक्रीवादळाच्या वाटचालीवर महाराष्ट्रातील पावसाचं भवितव्य ठरणार आहे. सध्याच्या ताज्या अंदाजानुसार येत्या २७ ते २९ ऑक्टोबरच्या काळात विदर्भ तसेच मराठवाड्यात पाऊस बरसू शकतो. पावसाचे हे प्रमाण नेमके किती असेल, हे अद्याप स्पष्टपणे सांगता येणार नाही. परंतु चक्रीवादळाची तीव्रता यावरूनच पाऊस किती आणि कसा असेल हे ठरणार आहे.

## ७ हजारांच्या कर्जापोटी दीड लाखांची मागणी, शेतकऱ्याचा संशयास्पदस्थितीत मृतदेह आढळला; मयताच्या आईचा आक्रोश

### कर्ज वसुलीच्या नावाखाली शेतकऱ्याचा बळी? मयत माळकौठ्यातील रहिवासी



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील एका खाजगी फायनान्स कंपनीच्या कार्यालयात शेतकऱ्याचा मृतदेह फाशी घेतलेल्या अवस्थेत आढळला.पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला. ही घटना शनिवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता उघडकीस आली. याप्रकरणी रात्री उशीरा फायनान्स मालक व इतर दोन जणांविरूद्ध अपहरण आणि खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत शेतकऱ्याचे नाव चंद्रकांत शिंदे (वय ४०, रा. माळकौठा ता. मुदखेड) असे आहे. त्यांनी खाजगी फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले होते. त्या वसुलीसाठी बुधवारी त्यांना गावातून कंपनीच्या कार्यालयात आणण्यात आल्याची माहिती आहे. शनिवारी सकाळी त्यांचा मृतदेह कंपनीच्या कार्यालयात आढळल्याने खळबळ उडाली आहे. मृत्यूचे नेमके कारण पोस्टमॉर्टेम रिपोर्टनंतर स्पष्ट होणार आहे.

**७ हजारांच्या कर्जापोटी दीड लाखांची मागणी –आईचा आरोप**

पैशांच्या वादातून हत्या झाल्याचा गंभीर आरोप मयताच्या आई सर्जाबाई शिंदे यांनी केला आहे. त्यांच्या माहितीनुसार, अवघे ७ हजार रुपये घेतले असताना संशयितांकडून १ लाख ५० हजार रुपयांची मागणी केली जात होती. पैशांसाठी फोनवरून सातत्याने दबाव टाकला जात होता आणि दोन दिवसांपासून मुलाला डांबून ठेवून छळ केला जात होता. संशयितांनी हत्येनंतर आत्महत्येचा बनाव रचल्याचा आरोप त्यांनी अश्रू अनावर होत केला आहे.

**७ हजारांचे कर्ज, ७० हजारांची मागणी –मुलीचा आरोप**

मयत शेतकऱ्याची मुलगी रुपाली शिंदे हिने सांगितले की, वडिलांनी सुरुवातीला ७ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्ज फेडल्यानंतरही कंपनीकडून ७० हजार रुपयांची मागणी केली जात होती. पैसे वाढवून द्या, नाहीतर मारून टाकू, अशी धमकी देत वडिलांना माळकौठा गावच्या बाजारातून बळजबरीने नेले. पैसे न दिल्यास घरातील महिलांनाही त्रास देऊ, अशी भाषा वसुली करणारे वापरत होते, असा आरोप तिने केला आहे.

आपल्या एकुलत्या एक मुलाच्या अशा जाण्याने कुटुंब हादरले असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी पीडित कुटुंबाने केली आहे.

घटनास्थळाला पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार, सहाय्यक पोलीस निरीक्षक चिमा बोईने यांच्यासह आदींनी भेट दिली असून सायंकाळी उशिरापर्यंत गळफास घेतलेला मृतदेह खाली उतरण्यात आला नव्हता.

**निष्पक्षपणे चौकशी करून आरोपीवर कठोर कारवाई करणार –पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन**

नांदेडमधील एका फायनान्स कार्यालयात ४१ वर्षीय तरुणाचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला असून, ही आत्महत्या नसून खून असल्याचा आरोप मृत तरुणाच्या आईने केला आहे. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि फॉरेन्सिकचे पथक घटनास्थळी दाखल झाले. नातेवाईकांची फिर्याद नोंदवून घेण्याचे काम सुरू आहे. मृतदेहाचे शवविच्छेदन (पीएम) आणि सखोल तपासणीनंतरच या प्रकरणातील सत्यता समोर येईल, तसेच पोलीस या प्रकरणाचा निष्पक्ष व सखोल तपास करत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन दिली आहे.

## सरावादरम्यान हवाई दलाची दोन विमाने एकमेकांना धडकली; ४ वैमानिकांचा मृत्यू

**मानिला (वृत्तसंस्था)–** फिलीपिन्समध्ये सराव उड्डाणादरम्यान हवाई दलाची दोन प्रशिक्षण विमाने हवेत एकमेकांना धडकून भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दोन्ही विमानांमधील ४ वैमानिकांचा जागीच मृत्यू झाला आहे. हा अपघात शुक्रवारी फिलीपिन्सची राजधानी मानिलाच्या दक्षिणेस असलेल्या बातांगस प्रांतातील फर्नांडो एअर बेसवर घडला.

हवाई दलाने दिलेल्या माहितीनुसार, एसएफ–२६० या मॉडेलची दोन विमाने नेहमीप्रमाणे सराव उड्डाणावर होती. स्थानिक माध्यमांनुसार, उड्डाणादरम्यान दोन्ही विमानांचे नियंत्रण सुटले आणि ती हवेतच एकमेकांवर आदळली. धडक झाल्यानंतर दोन्ही विमाने एअर बेसच्या आवारातच कोसळली. या दुर्घटनेत कोणतीही इतर जीवितहानी झालेली नाही, परंतु विमानातील चारही वैमानिक शहीद झाले.

## तिबेटमध्ये ७.० तीव्रतेचा भूकंप, १६ ठार

### शोध, बचाव, मदतकार्य सुरू; ड्रोनही तैनात



**ल्हासा (वृत्तसंस्था)–** तिबेटमध्ये आलेल्या तीव्र भूकंपामुळे किमान १६ जण ठार झाले असून अन्य ७६ जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. रिश्टर स्केलवर भूकंपाची तीव्रता ७.० इतकी मोजली गेली.

चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी बेपत्ता लोकांचा शोध घेण्यासाठी आणि बचावकार्यासाठी सर्व ते प्रयत्न सुरू करण्याचे, तसेच जखमींवर तातडीने वैद्यकीय उपचार सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

तिबेटच्या बेकन कौंटीमधील नागकू येथे हा भूकंप झाला, त्याचे केंद्र जमिनीखाली १० किमीपेक्षा कमी खोल होते. स्थानिक वेळेनुसार रात्री १०.३३ वाजता झालेल्या या भूकंपाने मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेची हानी झाली. त्यानंतर बचाव व मदत कार्य सुरू करण्यात आले. आतापर्यंत १,००० पूर्वनिर्मित घरे, तीन हजार ३२९ तंबू, दोन हजार ८२१ घडीचे पलंग आणि चार हजार २८० रजया अशी मदतसामग्री भूकंपग्रस्तांपर्यंत पोहोचवण्यात आल्याचे वृत्त चीनच्या शिन्हुआ या सरकारी वृत्तसंस्थेने दिले आहे. शुक्रवार संध्याकाळपर्यंत १२,४८९ लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले असून प्रभावित लोकांच्या पुनर्वसनाचे काम सुरू आहे.

## राज्यात रासायनिक खतांची ऑनलाईन नोंदणी, खरेदी; 'एफएफएफएस' प्रणाली राज्यभर लागू



**मुंबई (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांना अनुदानित रासायनिक खत खरेदीची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करण्यासाठी केंद्र शासनाने विकसित केलेली 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' (एफएफएफएस) प्रणाली २२ ऑक्टोबरपासून संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना खत विक्री केंद्रावरील खतांची उपलब्धता, खतांच्या साठ्याची, दराची माहिती भ्रमणध्वनीवर (मोबाईलवर) मिळणार आहे. शेत जमिनीच्या क्षेत्रानुसार खतांची आगाऊ नोंदणी करण्याची सुविधाही उपलब्ध झाली आहे.

या प्रणालीसाठी केंद्र सरकारने एफएफएफएस उपयोजना (ॲप) विकसित केले आहे. शेतकऱ्यांनी हे ॲप मोबाईलमध्ये डाउनलोड केल्यानंतर जवळच्या विविध खत विक्री केंद्रांवरील उपलब्ध खतांची माहिती आणि साठ्याचा तपशील मोबाईलवर पाहता येते. त्यामुळे खत खरेदीचे नियोजन करणे सोयीचे होते. दुकानांबाहेर रांगेत उभे राहण्याची गरज उरत नाही. या पद्वारे खतांचे आगाऊ बुकिंग केल्यानंतर संबंधित विक्रेत्याला बुक केलेले खत देणे विक्रेत्याला बंधनकारक होते. खतांच्या छापील किमतीपेक्षा अधिक दराने विक्री होणे आणि अनुदानित खतांसोबत इतर कृषी निविष्ठा खरेदी करण्याची सक्ती अर्थात 'लिंकिंग' या सारख्या प्रकारांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

राज्यात ही प्रणाली २२ ऑक्टोंबरपासून लागू झाली आहे, त्यापूर्वी नाशिक जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आली होती. आता संपूर्ण राज्यात अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या प्रणालीबाबत शेतकऱ्यांना काही तक्रारी, अडचणी किंवा शंका असल्यास त्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी अधिकारी अथवा पंचायत समिती कार्यालयातील कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## कर्जतमधील ३२ हजार ४९० झाडांच्या कत्तलीवरुन सयाजी शिंदेंची टीका

**रायगड (प्रतिनिधी)–** रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सायडोंगर परिसरात 'टोरंट पॉवर'च्या जलविद्युत प्रकल्पासाठी ३२ हजार ४८० झाडे तोडण्याच्या निर्णयावर अभिनेते आणि पर्यावरण कार्यकर्ते सयाजी शिंदे यांनी तीव्र शब्दांत टीका केली आहे.

सयाजी शिंदे यांनी या प्रचंड वृक्षतोडीचा निषेध केला असून, या प्रकल्पाविरुद्ध सुरू असलेल्या चिपको आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. गुजरातच्या 'टोरंट पॉवर' कंपनीच्या जलविद्युत प्रकल्पासाठी पाली तर्फे कोतवाल खलाटी आणि सायडोंगर परिसरातील शेकडो एकर जंगल व हजारो झाडांवर कुऱ्हाड चालवली जात आहे.

## चंद्रकांत शिंदे मृत्यूप्रकरणी कठोर कारवाईची मागणी

### आ. श्रीजया चव्हाण यांनी पीडित कुटुंबियांसह घेतली पोलीस अधीक्षकांची भेट



**नांदेड (प्रतिनिधी)–** माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यू प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आ. श्रीजया चव्हाण यांनी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्याकडे केली. याप्रसंगी चंद्रकांत शिंदे यांचे कुटुंबीय देखील उपस्थित होते.

शनिवारी सायंकाळी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात झालेल्या या भेटीमध्ये मृतक चंद्रकांत शिंदे यांची आई सर्जाबाई शिंदे आणि मुलगी रूपाली यांनी संपूर्ण घटनाक्रम पोलीस अधीक्षकांसमोर कथन केला. संबंधित आरोपींवर हत्येचे गुन्हे दाखल करण्याची मागणीही त्यांनी मांडली. त्यानंतर आ. श्रीजया चव्हाण यांनी हे प्रकरण अत्यंत गंभीर असून, कुटुंबीयांच्या मागणीप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. त्यावर उत्तर देताना पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी सदर प्रकरणी हत्येचे गुन्हे दाखल होत असल्याची माहिती दिली.

जिल्ह्यात सर्वत्र दुष्काळाची परिस्थिती असताना मायक्रो फायनान्स कंपन्यांनी अशा पद्धतीने तुघलकी कर्जवसुली करणे चुकीचे असून, त्यांना वेळीच आळा घालण्यात यावा, अशीही मागणी आ. श्रीजया चव्हाण यांनी पोलीस अधीक्षकांकडे केली. तत्पूर्वी, दुपारच्या सुमारास माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्याशी संपर्क साधून या प्रकरणाची माहिती घेतली आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची सूचना केली.




## सोशल मीडियावरील अनोळखी संपर्कापासून सावध राहा -डॉ. नीलाभ रोहन

### पाकिस्तानस्थित शहजाद भट्टी नेटवर्ककडून तरुणांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न; युएपीएअंतर्गत दहशतवादी संघटना घोषित



**नांदेड (प्रतिनिधी)–** सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांशी संपर्क साधून त्यांना कथितरित्या देशविघातक कारवायांकडे वळवण्याचा प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे युवकांसह सर्व नागरिकांनी Instagram, WhatsApp, Facebook आणि अन्य सोशल मीडिया माध्यमांवर अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या संदेशांबाबत सतर्क राहावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी केले आहे.

काही महिन्यांपूर्वी शहजाद भट्टी विषयी नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना यासंदर्भात सतर्कतेचे आवाहन करण्यात आले होते. पाकिस्तानस्थित शहजाद भट्टी नेटवर्कच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या काही तरुणांशी संपर्क साधला जात असल्याची माहिती समोर आली होती. अशा संपर्काद्वारे तरुणांना जाळ्यात ओढून देशविघातक कृत्यांसाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

केंद्र सरकारने शहजाद भट्टी नेटवर्कला बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम युएपीए अंतर्गत दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर संशयास्पद संपर्काला हलक्यात न घेता त्याची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांनी अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या संदेशाला उत्तर देण्यापूर्वी त्याची ओळख पडताळावी. वैयक्तिक माहिती, आर्थिक तपशील किंवा लोकेशन शेअर करू नये. संशयास्पद लिंक उघडू नये किंवा अनोळखी व्यक्तीने पाठवलेली फाइल अथवा ॲप डाउनलोड करू नये. हिंसक किंवा बेकायदेशीर कृत्यांसाठी प्रवृत्त करणारे संदेश आल्यास संवाद पुढे नेऊ नये. संशयास्पद बाब निदर्शनास आल्यास जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा नांदेड पोलिसांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अशा संपर्कात आल्याची किंवा जाळ्यात अडकल्याची शंका असलेल्या युवकांनी घाबरून न जाता त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा. वेळेवर माहिती मिळाल्यास योग्य ती मदत व कायद्यानुसार पुढील कारवाई करता येईल, असे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी स्पष्ट केले आहे.

## आम्हाला कारवाईपासून रोखलं जातंय, अधिकार हिरावले जातायत! एफडीएची आरोग्य मंत्रालयाविरोधात कोर्टात धाव

**पुणे (प्रतिनिधी)–** एफडीएने केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (एफएसएसएआय) विरोधात थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

कायद्याची अंमलबजावणी करण्यापासून रोखले जात असल्याचा आणि अधिकार हिरावून घेतले जात असल्याचा एफडीएने दावा केला आहे. एफएसएसएआयने घटनाबाह्य पद्धतीने समांतर अंमलबजावणी यंत्रणा निर्माण केली असून, त्याद्वारे राज्य सरकारच्या अधिकारांवर अतिक्रमण केल्याचा एफडीएचा दावा आहे. एफएसएसएआयच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी 'केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी' आणि 'केंद्रीय परवाना प्राधिकरण' यांसारखी पदे निर्माण करून आपल्या अधिकारांचा बेकायदेशीरपणे वापर केल्याचा याचिकेत म्हटले असून ही पदे अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याच्या वैधानिक चौकटीत बसत नसल्याचा एफडीएचा दावा आहे.

अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चा उद्देश अन्न नियमनाचे विकेंद्रीकरण करणे हा होता, असा दावा देखील एफडीएकडून याचिकेत करण्यात आला आहे. यापूर्वी या कायद्याची अंमलबजावणी राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त आणि नियुक्त अधिकारी यांच्यामार्फत केली जात होती असंही एफडीएने म्हटलं आहे.

# केरबा...

दिवस खूप जड वाटत होता. काही केल्या सरत नव्हता. आकाशाकडे बघून बघून केरबाचे डोळे थकले होते. सूर्य उगवून बरीच वर्षे झाली आहेत की काय असे वाटत होते. एक एक क्षण हा एका एका वर्षागत भासत होता. सकाळी उठल्यापासनं तो स्वतःला विसरल्यागत वावरत होता. आपल्या कामात नेहमी व्यस्त व मग्न असणारा केरबा आज मात्र तुसड्यासारखा वाटत होता. तो शेतात आंब्याच्या झाडाखाली झोपला होता. झाडाच्या शेंड्याकडे एकटक बघत होता. डोक्याखाली दगडाची उशी होती. सुर्य झाडाच्या पाणातून डोळ्यावर तिरपत होता. त्याचे डोळे गरगरत होते. डोळ्यांपुढे अंधारी येत होती. झाड गरगर फिरल्यासारखे वाटत होते. 'उभ्या आयुष्यात कधीच असे झाले नव्हते', असं तो मनाशी पुटपुटला. कितेक वेळा तो या झाडाखाली बसून राहिलेला व झोपला ही होता. असं कधी त्यास भासले नव्हते. तो एकदम चपापला, गांगरला व ताडकन उठून उभा राहिला.

केरबा थोडा वेळ विचार करत आंब्याच्या झाडाखाली ऊशी केलेल्या दगडावर तसाच बसून राहिला. तो त्याचा भूतकाळ आठवून बघितला. मागील आयुष्यातील भल्या बुऱ्या आठवणींची उजळणी केली. त्याच झाडाखाली असलेल्या बापाच्या समाधीवर जाऊन बसला. समाधीवर असलेला कचरा उफरण्याने झाडून घेतला. पक्षाची सीट काटकाने उकरून काढली. समाधीवर डोकं ठेउन नतमस्तक झाला. त्याचे डोळे भरून आले होते. आसवे असलेल्या डोळ्याने सैरभैर इकडे तिकडे पाहू लागला. शून्य मनाने व बधिर अंतःकरणाने तो तेथून ऊठला . शेतीचा कोपरा न कोपरा फिरून पिंजून काढला. झाड न झाड व फांदी न फांदी तो डोळे भरून पाहून घेतली. पाणी टाकून वाढवलेली झाडं त्यावरील पशू पक्षी त्याच्या जीवनातले अविभाज्य अंग होते . अन् तो तडक घराकडे निघाला .

दोन ते तीन वर्षांत एकदा ही मांयदळ व चांगल पिक आल कधिच आलेले नव्हते. अंगावर कर्जाचा डोंगर वाढलेला होते. आयुष्यात आता पुढे खोलच खोल न भरणारी दरी दिसत होती. कर्जाने झालेले जगण्याचे मातेरे व समांतर आयुष्यात निम र्ण झालेले खळगे. असे काहीबाही तो घरी बोलून दाखवत असे.

मुलीच्या लग्नाचे स्थळ निश्चित झालेले. तिचं कन्यादान व बोललेलं देणं. मुलाच्या शिक्षणाचे राहीलेले काही वर्षे व त्याची फिस भरणे. हे अशक्य असले तरी ते मला टाळता येत नाही. अस त्यास वाटायचे. दोन्हीही लेकरं आपल्या काळजाचे तुकडे ,मग त्यांचं भल आपल्याशिवाय कोण करणार ?. मी जर त्यांचा भल्याचा विचार नाही केला , तर पुरा जन्म माझा नाकर्ते पणा उगाळण्यात घालवतील? असे नेहमी त्याला वाटत असे.

दुसऱ्याबाजूस माझ्या आजोबा पणजोबा पासून चालत आलेली परंपरागत शेती. ते ही माझं काळीजच की? तेही माझं परंपरागत अपत्य ज्यामध्ये माझ्या पिढ्यानपिढ्याचा जीव अडकलेला. कायमचा त्यांच सानिध्य त्या शेतात असलेल? मी त्यास त्यास कसे विसरावे? अशा अनेक विचारांची शिदोरी मनात कालवत व अळखळत, ठेचकाळत केरबा घरी येऊन पोहोचला. पाय धुतले. बायको जवळ जाऊन बसला. एक तास बायको बरोबर चर्चा करून खिन्न मनाने बाहेर येऊन दाराजवळ बसला.

**कथा**

दोन काळीज एक लेकरांच्या भल्यासाठी समर्थन करते. आपल्या पिढीचा स्वार्थ बघायला सांगते. दुसरं काळीज जे पिढ्यानपिढ्याचा वारसा सांगणारे पूर्वजांच्या भावनांचं प्रतिक म्हणून शेत एक काळजाचा तुकडा अस्तित्व जपायला सांगते .दोन्ही प्राणप्रिय ,एकिकडे रक्तमासाच्या गोळ्यांचे भले व दुसरी कडे पिढीजात चालत आलेली पुर्वज वास्तव्याची काळी आई एक पारंपारागत नातं! अशा अनेक प्रश्न व



प्रश्नाचा गलका केरबाच्या मनात थैमान घालत होता. त्याच्या मनातले विचार व विचाराची वादळ काही थांबायची नाव घेत नव्हते. तहान भुक विसरून तसाच तो दाराजवळ बसून होता.

आज पोरगं शिक्षणाच्या गावाहून येणार होत. त्याच्यासाठी अधूनमधून तो रस्त्यावर दुर दूर नजर फिरवत होता. पोरगं आलेल पाहून केरबा भानावर आला. ते दोघे घरात आले. सगळ्यांचे जेवन वैगरे झाले. मुलगा, मुलगी व आई वडील एकत्र बसले.गप्पा ठप्पा झाल्यावर केरबाने हळूच विषय काढला. मी उद्या सकाळी जो निर्णय घेणार आहे. त्यासाठी कुणास हु ना चु करू देता , तो त्यांचे वचन घेऊन झोपण्यासाठी गोठ्याकडे निघून गेला. ईकडे बायको व लेकरांच्या बोलण्याचा गलका मध्यरात्रीपर्यंत तसाच चालू होता. सकाळी तो लवकर उठला सर्व काम धंदा उरकून बैलांना पाणी पाजलं व वैरण पाणी घातलं. अंघोळ न्याहरी करून बसला.

बैठकीसाठी येणाऱ्या गावातल्या लोकांची वाट बघत होता . बैठक झाली व त्या बैठकीत काळजाचा टुकडा असलेल्या शेताचा सौदा झाला. जाता जाता बैठकीतल्या लोकांनी प्रश्न केला की, आता बैलांचं काय?. खरंच बैलाचं काही काम नाही. त्या बैठकीत बैलाचाही सौदा झाला. सगळं विकून खऱ्या अर्थाने केरबा आता शेतमजूर झाला. शेत व बैल सौद्याचे अर्धे पैसे मि ळाले. व सहा महिन्यात ऊरले पैसे देऊन विक्रीखत करण्याचे ठरले. तसे करार पत्रही बनवल्या गेले.

केरबाने सर्व सोपस्कार व कन्यादान यातील देणं व्यवस्थित आटोपलं. धुम धडाक्यात मुलीचे लग्न पार पाडले. मुलीला निरोप देताना केरबाचं अंतःकरण भरून आलं. तो मुलीला म्हणाला, 'तुझ्या व घरच्या भल्यासाठी एक काळजाचा टुकडा विकून टाकलाय, तुझा बाप आता पोरका झालाय गं पोरी. सासरंच सर्व सहन कर पण माहेराकडून कसलीच अपेक्षा ठेवू नकोस'. बाप लेक गळ्यात गळा घालून बराच वेळ रडले.

अनेक पिढ्यांनी जपलेली परंपरागत शेती विकल्या गेली होती.

तळहातावर वाढवलेली लेक आज घर सोडून जात होती.

केरबा सर्व आवराआवर करुन थकला होता. चार घास खाऊन रिकाम्या मंडपात तसाच झोपी गेला.

ठरल्याप्रमाणे विक्रीखत केल्या गेले. जवळपास सर्वच पैसे केरबाकडे पोहचले होते. एवढी सुगी केरबान घ्यावी असं अगोदरच ठरलं होतं. मुलाच्या शिक्षणाचं जोतकी लावलेलं होतं. दोन वर्षाचे फिस व राहण्याखाण्याची व्यवस्था करुन ठेवलेली होती. तो मुलाला म्हणाला, 'सोण्याचा तुकडा तुझ्यासाठी गहान ठेवला. तुझ कर्तव्य तू पार पाडावस ही माझी तळमळ व त्यामागिल त्याग तुला कळावा हीच माझी शेवटची इच्छा समज म्हणजे झाले. मी आता माझ्या कर्तव्यातून मुक्त झालो.'

बापदाद्यापासून चालत आलेला परंपरागत जमिनीचा तुकडा विकल्याची बोच केरबाच्या मनात कायमची घर करून बसली. तो या विचाराने खंगत चालला होता. विचाराची जागा आता मानसिक विकाराने घेतली. सुगी संपली. जेमतेम खायापुरतं पिकल. बँकेचे कर्ज व पुर्वीचे

हातउसने काही अद्याप फिटले नव्हते . कर्जाचा डोंगर दुःखाची दरी घेऊन तसेच पुढे ऊभे होते. ईकडे आड व तिकडे विहीर अशा द्विधा मनस्थितीत तो विफल व विकल झाला.

मुलगा सुट्टी म्हणून गावाकडे आला होता. केरबाने त्यास काही हिताच्या गोष्टी सांगितल्या,आता सर्वस्व तुझ जीवन तुला जगायचं आहे. शेत हातातून जाईल. तुझ्या आईला व मला मजुरी करावी लागेल. तुझ्यासाठी मी पाहिलेलं शिक्षणाचं ध्येय तु कधीच सोडायचं नाही. मला माझा बा जरी स्वर्गात जरी बोलावला तरी माझ्या मरणाच भांडवल करून त्यांचे श्रेय लाटण्याचे प्रयत्न करू नकोस. तस झाल तर मी मेल्यावरही मला सुख मिळणार नाही. तुला काही अनुदान मिळाले तरी ते काही जन्मभर पुरणार नाही. मी जन्म घेतला व तुमच्या रुपाने येवढा पसारा निर्माण केला. मी तो पेलू शकलो नाही. याच खापर अनुदानासाठी कोणत्याही व्यवस्थेवर फोडू नकोस. तिथे तुझ्या बापाचा नाकर्ते पणा दिसेल. मी गेल्यावर मी विकलेल्या शेतात माझ्या आजोबाच्या शेजारी माझी समाधी बाधायला विसरू नकोस.शेती घेणारा तसं करु देत नसेल तर त्याच्या अपेक्षा पुर्ण कर. त्यासाठी कर्ज घेतले तरी चालेल. दोघांच्याही डोळ्यातून असवं वाहू लागली. मुलांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली.अवकाळी पावसासारखी मनात विज कडाडली. मनात चर् केलं अन् तो अतून भाजून निघाला.

दिवस ऊगवला. केरबा सकाळी सकाळी शेतीकडे गेला. घराकडे आलाच नाही. शेत घेणाऱ्यास सोडून देण्याचा आजचा शेवटचा दिवस होता. तो आजोबाच्या समाधी शेजारी निपचीत पडलेला होता. न हलता न डुलता तो तेथे निपचीत पडून होता. कायमचे त्यास आंब्याच्या झाडाखाली आपल्या पूर्वजांच्या सोबत वास्तव्यासाठी राहावयाचे होते. झाडाच्या शेंड्याकडे बघत केरबा कायमचा निपचित झोपलेला होता. कर्ज कोन्हीतरी फेडेल व माफही होईल. केरबा मात्र कर्जाच्या कचाट्यातून सुटला कायमचा. कोणते विचार त्यास जीवनाच्या शेवटाकडे घेऊन गेले? हा प्रश्न सर्वांना समजतो. पण खरं उत्तर कोणीच देत नाहीत. त्याच्या मनाचे गुढ कोणाला काही केल्या सुटले नाही. शेती गेली मग आपण मेल्यावर आपणास आपल्या शेतात पुरण्यासाठी जागा मिळेल का? हेच कोडे त्याच्या मरण्यामागे असेल का? असे अनेक प्रश्न शेतकरी व शेती संस्कृतीशी निगडीत आहेत. ते कधीच सुटणारे नाहीत. म्हणून अकाली निघून जाण्याची घाई करणे हे शेतकऱ्यांना हिताचे नाही. शेतकऱ्यांच्या जाण्याने कांही जुजबी प्रश्न सुटतात पण सगळं चांगलं होईल असं नाही.

कुटुंब व कुटुंब व्यवस्था कोलमडून जाते. लेकरं व बायकोचा आधार निघून जातो. कुटुंबाच्या भविष्याचं मखतेरं होते. हे सगळं केरबा सारख्या शेतकऱ्यांना कळायला हवे. शेती आणि समस्या पाचविल पुंजलेल्या असतात. मग त्याचं उत्तर आत्महत्या नाही. कुटुंबासाठी जगता जगता अनेक वेळा मरत राहणं आणि कुटुंब व्यवस्था बळकट करणं ही गोष्ट शेतकऱ्यांनी अंगीकारली पाहिजे.

**–व्यंकटेश सोळंके**
नांदेड
मो. ९९२२६५४७३२

# गोदावरी : अ मॅनिफेस्टो ऑफ एक्झिस्टन्स–चिंतनशील काव्य प्रवाह



प्रदीर्घ काळ आदिम इतिहासातपासून आपलं सृजन अस्तित्व प्रवाहित ठेवून निरंतर वाहणारी गोदावरी नदी हिच्याशी संवादात्मक हितगुज करीत आपले मत आणि तिचे अस्तित्व यात सुसंवाद करणारे एक चिंतनशील व्यक्तिमत्व!!अर्थातच कवी सुरेश शंकरराव जोंधळे...

सृजनशील कविमनाचे, वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक बांधिलकी जपण–ारे यांचा, गोदावरी :अ मॅनिफेस्टो ऑफ एक्झिस्टन्स हा दिर्घकाव्यसंग्रह नुकताच वाचण्यात आला. गोदाकाठचे कलंदर, निर्व्याज फकिरी व्यक्तिमत्वाचे सुरेश जोंधळे यांची गोदावरी नदीवरील नितांत आस्था, असीम श्रद्धा, विलक्षण आत्म ीयता तिच्या बद्दल असलेले मातृप्रेम त्यांच्या काव्यप्रवाहातून व्यक्त होते. या आत्मीयतेपोटी त्यानीं गोदेशी संवाद साधत कधी मौनाच्या भाष्यातून, तर कधी आत्म कथनातून, गोदेच्या प्रवाहबोलीतून त्यांची काव्य रचना वाचकाशी तादात्म्य होते. आपल्या वैयक्तिक भावनेतून सामाजिक भावनांशी आपल्या शब्दकाव्याद्वारे प्रगटरत होणे. हे फार थोडया साहित्यिकांना जमतं, त्यातले सुरेश जोंधळे आहेत. हे विशेषत्वाने सांगणे!

गोदातटी राहणारा हा गोदाकाठचा नांदेडवासी अगदी बाल्यावस्थेपासून निरंतर आजपर्यंत तिच्याशी तद्रूप होतो. तिच्याकडे एक नैसर्गिक घटक म्हणून न पहाता मानवी मूल्याचा केंद्रबिंदू या नात्याने तिच्याशी जवळीक साधतो. नदी ही मानवी संस्कृतीची उगमस्थानआहे. तिच्या काठी मानवी लोकजिवन बहरले, सांस्कृतिक परंपरा विकसित झाल्या. भौगोलिक परिसिमांचे निर्देश, राजसत्ता, सत्तासंघर्ष, वैभवशाली इतिहास, सत्तेचा ऱ्हास या विविध घटकांची, परिमाणांची ती साक्षीदार होती.

**पुस्तक परिचय**
**प्रा. ललिता शिंदे (बोकारे)**
लातूरफाटा, न्यू मोंढा मार्केट,
सिडको, नांदेड.

संत काव्यात तर नदीला अनन्य साधारण असे स्थान आहे. तिला संतांनी अध्यात्माची केंद्रक बनवलंय . देव आणि दैव, यशदा आणि विपदा या कोंदनात आपण तिला पहातो. कवीमन शब्दबद्ध होते....

ओव्या, भारूडं,
लोकगीतं,
आणि अभंगही
संतांनी इथे
शब्दांना नदीत उतरवलं –
शब्द वहात गेले
लोकांपर्यंत पोहोचले..

तात्पर्य, संतांच्या मनोभूमिकेची साक्षीदार नदी आहे. हे कवीला सुचवायचे आहे. आज मानवाने आपल्या ऐहिक सुखासाठी, किंबहुना स्वार्थासाठी आपलं माध्यम बनवलंय, याची जाणीव कविला आहे. गोदावरीचे बहुविध, बहूआयामी चित्रण करतांना कवि स्वतःचे विचार स्पष्ट करतो...

हा संग्रह
एका साक्षीदाराचा आहे ––
ज्याने पाहिलं,
समजून घेतलं,...
गोदावरी माझ्यासाठी
फक्त नदी नाही.
ती भाषा आहे
ती लोकजिवन आहे.
ती सत्ता आहे,
ती जखम आहे,
आणि शेवटी
ती प्रश्न आहे

खरं पाहता या काव्यसंग्रहास दीर्घकाव्य किंवा खंडकाव्य या परिमाणात न मोजता मानवी ऐहिक मूल्यांची तळमळीने जप–वणूक करणारा तसंच मानवी जिवनाच्या विविध समस्या, विविध चिंतनशील प्रश्न, आस्था आणि अनास्थाच्या परिघात गुंतलेले विचार, मानवी मनाची–कविम नाची संभ्रमावस्था, निती –अनिती ची चक्रावस्था, प्रचंड सामाजिक विषमता, ताण –तणाव या विषमते तून समतेकडे येण्याचा केविलवाणा प्रयत्न, मानवी मूल्यांची होत असलेली पडझड–परवड, माणूस, विविध नैसर्गिक घटक, राजकीय सत्तांचा हैदोस हे सारं अवती भवती दिसत असतांना कविमन बिथरते, शब्दव्याकुळ होते. कविमन सैरभैर होते. तो आपले अस्तित्व प्रांजळपणे गोदेपुढे ठेवत तिच्याशी संवाद साधतो. त्याच्या आंतरिक मनातून नदी व्यक्त होते––

तुम्ही मला
धरणात मोजलं
अकड्यात विभागलं,
सभा –मंचावर
माझं नाव घेतलं,...
उत्सवात मी पवित्र,
मरणात मी मुक्ती,
पण रोजच्या आयुष्यात
मी फक्त
वापराची सोय...

गोदावरी नदी, ही प्रतिका–त्मकता ठेवून कविने सबंध मानवी जीवनाचे सांगोपांग चिंतन आपल्या तरल अल्पाक्षर रमणीय शब्दप्रवाह–ातून यतार्थरित्या केले आहे. कविची तिच्यासंगे होणारी तद्रूपता, त्याची वैश्विकता या दिर्घ काव्याला यशोशिखरावर नेणार,हे मात्र नक्की!!... तो पुढे शब्दभाष्य करतो.

गोदावरी
आमच्या श्रद्धेवर रागावत नाही,
ती फक्त
दुखावलेली आहे.
संस्कृती वाचवायची असेल –
तर आधी
नदी वाचवावी लागेल –
कारण तीच
आपली खरी
परंपरा आहे.

परंपरेला, संस्कृतीला प्रवाहित करणारी गोदावरी नदी ही अवघ्या महाराष्ट्राची अस्मिता बनून राहिली आहे. कवि पुढे शब्दबद्ध होतो–

गोदावरीच्या प्रवाहात
फक्त पाणी नाही,
शब्दही वाहत आलेत...

संवेदनशील कवि सुरेश जोंधळे यांची नांदेड ही जन्मभूमी, तसंच कर्मभूमी ही! गोदेच्या संयमी प्रवाहात डुंबणारा, तिच्या कुशीत पहूडणारा हा मस्त कलंदर कवि गोदावरीकडे मातृकभावनेने पहातो, नव्हे!! ती त्याच्या जगण्याची, अवघ्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय लोकजीवनाची साक्षीदार आहे. हेच कवीला या दीर्घकाव्याच्या माध्यम ातून सुचवायचे आहे.

या काव्यसंग्रहास प्रस्तावना प्रा. महेश जोशी सरांची लाभली आहे, आणि मनोगत न्यायमूर्ती प्रसन्न भा. वराळे यांनी यथोचित असे केले आहे.

प्रांतवाद, जातीयवाद, भाषावाद, मानवी कुटनिती, द्वेषभावना, दैनंदिन जिवनातील भयावह वास्तवता, भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यातील येणारे अचूक वेध या साऱ्यांच्या गर्ते तून हे काव्य फक्त गोदावरी आणि कवि यांच्यातील मूकसंवेदना किंवा भाष्य ठरत नाही. तर, वाचकालाही अंतर्मुख करतो.

कविमन आणि वाचकाला वैयक्तिक पातळीवरून वैश्विक पातळीवर नेऊन ठेवणारा हा काव्यसंग्रह वाचकांच्या अंतर्मनाचा ठाव घेतो. अंतरंगात आपली एक जागा स्थापित करतो हे या दिर्घकाव्याच्या यशाचे गमक आहे. हे मात्र निश्चित!!

**कवी – सुरेश शंकरराव जोंधळे**
**प्रकाशन–ल्युमिनन्स पब्लिकेशन, सोलापूर**
**प्रकाशक –डॉ. इम्रान मुल्ला**
**पुस्तक मूल्य –२५० रू.**

## ये चांदण्यांच्या पावलांनी...!

नभांगणी चंद्रमा,
ओंजळीत चांदणे,
भाळता तुझ्यावरी का?
जीवाचे हे गुंतणे

अबोल शब्दभावनांचे,
ओठांवरती झुरणे,
पापणीतल्या अश्रूंचे,
पावसासम कोसळणे

धूसर झाल्या चांदण्यांचे,
चंद्राला बिलगून जाणे,
गुज अंतरीचे कळूनही,
का तुझे हे अबोल राहणे?

क्षितिजही मोहरता
पौर्णिमेचे शृंगारणे,
अधीर झाल्या लोचनांचे,
तुला आठवता लाजणे

ये चांदण्यांच्या पावलांनी,
हेच आता मागणे,
प्रीतगंधीत या क्षणांचे,
सजले ओठांवरती गाणे

**–रूपाली वागरे/वैद्य**
नांदेड
मो. ९८६०२७६२४१

## विचार करूया

मानव जन्म का लाभला
याचा विचार करू या
माणुसकीचे खरे नाते
हृदयी आपण भरू या
एक ध्येय साऱ्यांचे
असोत अनेक मार्ग
दूर व्हावे विकार अन्
लाभो सदा सन्मार्ग
काळ पाठी लागला
वेळ ही दवडत आहे
कधी करशील सत्कर्म वेड्या
दुर्गुण का निवडत आहे
प्रत्येक अंधारलेल्या वाटेवर
ज्ञानाचा प्रकाश पडावा
अनुभवातून भेद कळावे
सत्याचा संग घडावा
आज पुन्हा एकदा नव्याने
अंतरी सद्भाव भरुया
सारे मिळून एकत्व जपूया
देशाचा विचार करू या

**–पवन श्रीरंगसा कुसुंदल,**
नांदेड
सदस्य, मराठीचे शिलेदार समूह
मो. ९०७५५९५६९५

# कोजागिरी पौर्णिमा : परमपवित्र रासलीलेचा उत्सव

आज कोजागिरी पौर्णिमा! आजच्या रात्री साक्षात लक्ष्मीदेवी चंद्रमंडळातून पृथ्वीवर उतरते, आणि मध्यरात्री 'को जागर्ति' (म्हणजे 'कोण जागत आहे') असे म्हणत मनुष्याचे साधनेचे प्रयत्न पहात पृथ्वीतलावर संचार करत असते. आजच्या पावन दिवशीच द्वापरयुगात श्रीकृष्णाने त्याच्या परम भक्त गोपी आणि राधा यांच्यासमवेत रासलीला करून त्या माध्यमातून गोपी अन् राधा यांना साधनेतील सर्वोत्तम आनंदाची अनुभूती दिली होती. वृंदावनातील भगवान श्रीकृष्णाचे स्मरण जरी केले, तर आपल्याला आठवते ती रासलीला! साक्षात् भगवंताच्या समवेत केलेली रासलीला ही त्याची एक लीलाच आहे.

श्रीमद्भागवत महापुराणात महर्षि व्यासांनी वर्णन केल्याप्रमाणे त्या रात्री हा रासोत्सव चालू झाला आणि तो दिशा प्रकाशेपर्यंत, म्हणजे सकाळपर्यंत अविरत चालू होता. 'साक्षात् भगवंताच्या समवेतचा तो रास किती अद्वितीय असेल !', याची खरेतर शब्दांत मांडणी करता येत नाही. गोपींच्या भक्तीला 'आदर्श भक्ती' म्हणतात. मोहमायेपासून



विरक्त असलेल्या गोपी आणि भगवान श्रीकृष्ण यांची रासलीला किती पवित्र असेल ! श्रीकृष्णाने बासरीवर गोपींना प्रिय असणारे गीत वाजवण्यास प्रारंभ केला आणि तो ध्वनी गोपींच्या कानी गेला. भगवंत वाजवत असलेल्या वेणूच्या नादाने त्या देहभान विसरून आणि आपल्या सर्व कृती टाकून श्रीकृष्णाकडे धावत गेल्या. गोपी श्रीकृष्णाकडे आल्यावर त्याने गोपींना सांगितले, ''रात्रीच्या वेळी आपले घरदार सोडून माझ्याकडे येणे' हा अधर्म आहे.''

भगवंताचे वचन ऐकून गोपींनी श्रीकृष्णाला सांगितले, ''कृष्णा, हा जो सगळा उपदेश आहे, तो योग्यच आहे; परंतु सर्व कृतींचे लक्ष्य काय आहे ? तुझी प्राप्तीच ना! भगवंता, आम्हाला तुझ्या भक्तीचे वेड लागल्यामुळे प्रत्यक्ष भगवंत, म्हणजे तू समोर असतांना आम्ही मागे तरी कशा जाऊ ?'' गोपींच्या या बोलण्यामुळे भगवंत अतिशय आनंदी होतो. भगवान श्रीकृष्ण गोपींचे तीव्र मुमुक्षत्व पाहून अध्यात्मातील 'उत्तमाधिकारी' म्हणून त्यांचा स्वीकार करतो. अनेक मोठे तपस्वी घरादाराचा मोह सोडू शकत नाहीत, तो मोह गोपींनी सोडला. त्यामुळे श्रीकृष्णाने अत्यंत कौतुकाने त्यांचा स्वीकार करून त्यांच्या समवेत रासलीला केली. या सूत्रावरून आपल्याला हे शिकायला मिळते की, गोपींची श्रीकृष्णप्राप्तीची ओढ किती तीव्र होती ! भगवंताने त्यांना 'परत जा', असे सांगूनही त्या गेल्या नाहीत.

देवाच्या परीक्षेत त्या उत्तीर्ण झाल्या आणि भगवंताच्या समवेत रासलीला करू शकल्या. या रासलीलेच्या वेळी लक्षावधी गोपींच्या समवेत तेवढीच रूपे धारण करून श्रीकृष्णाने रासलीला केली. ती करत असतांना गोपींची तेवढीच रूपे धारण करून श्रीकृष्ण तितकाच काळ त्या गोपींच्या पतींच्या समवेत होता. रासलीलेचे आध्यात्मिक माहात्म्य सांगतांना व्यासांनी भागवत महापुराणात सांगितले आहे, 'जो कुणी श्रद्धायुक्त होऊन गोपींच्या समवेत (व्रजबालांच्या समवेत) भगवान श्रीकृष्णाने केलेल्या रासलीलेचे श्रवण करतो आणि तिचे वर्णन करतो, त्याला भगवंताच्या चरणी परम भक्तीची प्राप्ती होते.' सुदामा, अर्जुन इत्यादी श्रीकृष्णाचे अनेक भक्त आहेत; परंतु त्यांतील राधा आणि गोपी यांचे महत्त्व विशेष आहे. त्या मधुराभक्तीद्वारे, म्हणजे 'श्रीकृष्णच आम चा प्रियतम आहे', या भावाने श्रीकृष्णाशी एकरूप झाल्या होत्या. अनेकजण राधा–कृष्णाच्या संबंधाच्या संदर्भात टीका करतात.

श्रीकृष्णाच्या संदर्भात बरे–वाईट बोलले जाते; परंतु प्रत्यक्षात त्या वेळी श्रीकृष्णाचे वय केवळ ८ वर्षे होते आणि गोपी वयाने मोठ्या होत्या. द्वापरयुगात आजच्या दिवशीच रासलीला झाली होती. आपणही आजच्या या पावन दिवशी भगवान श्रीकृष्णाच्या भक्तीत आपले पुढील जीवन व्यतीत करण्याचा, म्हणजेच गोपींप्रम ाणे साधना करत श्रीकृष्णभक्ती करण्याचा आज संकल्प करूया.

(संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)

**–जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# दुष्काळात पशुधनासाठी चारा व्यवस्थापनावर भर द्या -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

- महावीर चौकात दूध उत्पादक पशुपालकांशी साधला थेट संवाद
- चारा साक्षरता अभियानातून शास्त्रीय व्यवस्थापनाचे आवाहन
- दूध उत्पादकांच्या समस्या सोडविण्यासाठी थेट समन्वय



**नांदेड (प्रतिनिधी)–** दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी पुरेसा व सकस चारा उपलब्ध होण्यासाठी शेतकरी आणि पशुपालकांनी उपलब्ध पीक अवशेषांचा योग्य वापर करावा. चारा उत्पादन, साठवणूक आणि पशुखाद्य व्यवस्थापनाच्या शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

औरंगाबाद पदवीधर मतदार संघाच्या विधानपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने नांदेड शहरातील मतदान केंद्रांना भेटी देत असताना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी महावीर चौक येथे दूध विक्रीसाठी आलेल्या ग्रामीण भागातील दूध उत्पादक पशुपालकांची आकस्मिक भेट घेतली. यावेळी त्यांनी पशुपालकांशी थेट संवाद साधून जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता आणि चारा साक्षरता अभियानाबाबत चर्चा केली.

या संवादादरम्यान निकृष्ट चारा सकस बनविण्याच्या विविध पद्धती, युरिया-मोलॅसिस प्रक्रिया, मुरघास निर्मिती, अझोला उत्पादन आणि जलद हिरवा चारा उत्पादनाच्या जलसंवर्धित तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उपलब्ध सोयाबीन कुटार, हरभरा कुटार, गव्हाचे काड आणि इतर पीक अवशेषांवर योग्य प्रक्रिया करून त्यांची पौष्टिकता वाढविता येते. तसेच हिरवा मका व नेपिअर गवतापासून मुरघास तयार करून त्याचा दुष्काळी काळात उपयोग करता येतो. कमी खर्चात अझोला आणि जलसंवर्धित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हिरवा चारा उपलब्ध करण्यावरही भर देण्यात आला.

सोयाबीनचे कुटार न जाळता त्याचा पशुखाद्य म्हणून वापर करावा किंवा त्याची विक्री करून आर्थिक लाभ मिळवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. चारा साक्षरता अभियानाच्या माध्यमातून चारा उत्पादन, साठवणूक आणि शास्त्रीय पशुखाद्य व्यवस्थापनाबाबत पशुपालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

दूध उत्पादकांच्या विविध समस्या व अडचणींचे त्वरित निराकरण व्हावे, यासाठी दूध उत्पादकांच्या व्हॉट्सप समूहात जिल्हाधिकारी कार्यालयातील तसेच पशुसंवर्धन विभागातील संबंधित अधिकाऱ्यांचा समावेश करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. यामुळे दूध उत्पादक आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद साधून समस्यांवर प्रभावी उपाययोजना करणे शक्य होणार आहे.

जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून रब्बी हंगामात चारा उत्पादनासाठी ज्वारीच्या बियाण्यांचे शंभर टक्के अनुदानावर वाटप करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या योजनेचा लाभ घेऊन शेतकरी व पशुपालकांनी चारा उत्पादन वाढवावे आणि आगामी काळातील चाऱ्याची गरज लक्षात घेऊन नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी संतोष वाघमारे व शिवानंद सूर्यवंशी (कोटीतीर्थ), बालाजी श्रीसागर (बोरगाव), दत्ता शिंदे (डोनवाडा), दिनकर भोसले (वाघी) आणि नामदेव येवले (मार्कंड) या दूध उत्पादक पशुपालकांशी जिल्हाधिकाऱ्यांनी संवाद साधला. दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संवर्धन, चारा व्यवस्थापन आणि दूध उत्पादकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाकडून थेट संवाद व समन्वयाला प्राधान्य देण्यात येत आहे.

# बालसाहित्य म्हणजे आनंदी आयुष्याची पायाभरणी –डॉ. सुरेश सावंत




**नांदेड (प्रतिनिधी)–** सोपे लिहिणे ही अतिशय अवघड गोष्ट असते. बालसाहित्य म्हणजे घडीभराची करमणूक नसून बालकांच्या आनंदी आयुष्याची पायाभरणी असते, असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांनी केले.

बालाजी भागानगरे लिखित 'गाऊ मजेत गाणे' ह्या मिहाना पब्लिकेशन पुणे यांनी प्रकाशनासाठी सिद्ध केलेल्या बालकवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा डॉ. सुरेश सावंत आणि केंब्रिज हायस्कूलच्या प्राचार्या श्रीमती रेवती गव्हाणे यांच्या हस्ते सायन्स कॉलेज येथे नुकताच पार पडला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे हे होते.

डॉ. सुरेश सावंत पुढे म्हणाले, की बालकविता म्हणजे निरागस, निखळ, निर्मळ आणि निष्पाप मनाने बालकुमारांशी साधलेला संवाद असतो. बालाजी भागानगरे यांना हा संवाद छान जमला आहे. बालसाहित्य लिहिताना मनोरंजन, ज्ञान आणि मूल्यसंस्कार या गोष्टींचा ताल आणि तोल सांभाळता आला पाहिजे. बालाजी भागानगरे यांची बालकविता आनंददायी जगण्याचा मूलमंत्र देते. भागानगरे यांचा 'गाऊ मजेत गाणे' हा बालकवितासंग्रह इतका छान झाला आहे की, यात त्यांनी शब्दचमत्कृती आणि अर्थसमृद्धी यांचा सुंदर मेळ साधला आहे.

श्रीमती रेवती गव्हाणे म्हणाल्या, की बालसाहित्यातून जीवनमूल्ये शिकविली जातात, ज्याची सद्यस्थितीत अत्यंत आवश्यकता आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. लक्ष्मण शिंदे यांनी 'गाऊ मजेत गाणे' या बालकवितासंग्रहातील काही ओळी वाचून दाखवल्या आणि बालाजी भागानगरे यांना पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. ,

डॉ. धाराशिव शिराळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स. ना. जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास नांदेड येथील नामवंत साहित्यिक, रसिक आणि बालाजी भागानगरे यांचे मित्रमंडळ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# मुदखेडमध्ये वोट चोरी विरोधात काँग्रेसचा एल्गार

## 'ज्ञानेशकुमार हटाव देश बचाओ'च्या घोषणांनी शहर दणाणले



**मुदखेड (प्रतिनिधी)–** देशातील निवडणूक प्रक्रियेतील मतदार यादीतील सावळा गोंधळ पारदर्शकता तसेच मताच्या अधिकाराचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेस पक्षाच्यावतीने काढण्यात आलेली दुचाकीस्वार रॅली लक्षवेधी ठरली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात वोट चोरी ईव्हीएम हटाव या मुद्द्यावरून केंद्रातील सत्ताधाऱ्यांना जवाब विचारण्यासाठी एल्गार पुकारण्यात आला.

'ज्ञानेश कुमार हटाव देश बचाओ' च्या घोषणांनी मुदखेड शहर दणाणून गेले. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची लेखी मागणी निवेदनाद्वारे तहसील प्रशासनास करण्यात आली आहे.

मुदखेड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने खासदार रवींद्र चव्हाण यांच्या आदेशान्वे उत्तर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, पप्पू पाटील कोंडेकर , युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे , तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक. २२(गुरुवार) लक्षवेधी दुचाकी रॅली काढण्यात आली होती. कालेजी मंदिर येथून निघालेली मोटरसायकल रॅली मराठा गल्ली, मठ गल्ली, जुने पोलीस स्टेशन, गुजरी चौक, मोंढा मैदान या मार्गे शहरातल्या विविध मुख्य ठिकाणी काँग्रेस कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियततेच्या मुद्द्यावर आवाज उठविला. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर , छत्रपती शिवाजी महाराज, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नियोजित पुतळ्याजवळ नाम फलकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आहे.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा दुचाकीची लक्षवेधी रॅली तहसील कार्यालयावर धडकल्यानंतर विविध मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार मारुती जगताप यांना देण्यात आले आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, उपाध्यक्ष तिरुपती कोंडेकर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे, प्रताप देशमुख, राजबहादुर कोतावर, करीम खान साहब, गोविंद प्रसाद कलानी, गंगाधर डांगे, गिरीश कोतावार, मुजीब पठाण, तेजाब पाटील, दादाराव पाटील नागेलीकर, अविनाश चौदंते, अहमद खदीर, संजय बोकेफोड, बंडू पाटील, गंगाधर मगरे पाटील, प्रशांत पाटील मुंगल, शिवानंद देवके, वेदांत शेवते यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# सावरगाव माळ येथे पशुधनाच्या पाणीटंचाईची अधिकाऱ्यांकडून पाहणी

## पशुधनाला पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तातडीच्या उपाययोजना राबविण्याबाबत मार्गदर्शन



**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर तालुक्यातील सावरगाव माळ येथे पशुधनासाठी निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी पशुधनाला पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून देणे आणि टंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या पाहणीवेळी जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे, पंचायत समिती भोकरचे गटविकास अधिकारी शेखर देशमुख, भोकरचे नायब तहसीलदार आणि पशुधन विकास अधिकारी डॉ. अविनाश बुन्नावार उपस्थित होते.

या पाहणीदरम्यान पशुधनासाठी पिण्याच्या पाण्याची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करणे, पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तातडीच्या उपाययोजना राबविणे तसेच भविष्यातील पाणीटंचाईचे निवारण करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयातून आवश्यक कार्यवाही करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.

पशुधनाचे संरक्षण आणि त्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देऊन पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

# श्री कृष्ण गोशाळेस चारा व टिनशेड उपलब्ध करून द्या; नांदेड-हैदराबाद बस कुंडलवाडीमार्गे सोडण्याची मागणी



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर कुंडलवाडी येथील श्री कृष्ण गोशाळेतील गोवंशासाठी चारा उपलब्ध करून द्यावा, चारा साठवणुकीसाठी टिनशेड उपलब्ध करून द्यावे, तसेच नांदेड-हैदराबाद बस कुंडलवाडीमार्गे सुरू करण्यात यावी, अशा विविध मागण्यांचे निवेदन बिलोली-देगलूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार जितेश अंतापूरकर यांना देण्यात आले.

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतशिवारात चारा उपलब्ध होत नसल्याने गोशाळेतील गोवंशाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे श्री कृष्ण गोशाळेतील जनावरांसाठी तातडीने चाऱ्याची व्यवस्था करावी, तसेच चारा सुरक्षितपणे साठवून ठेवण्यासाठी टिनशेड उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यासोबतच कुंडलवाडी परिसरातील नागरिक व प्रवाशांच्या सोयीसाठी नांदेड-हैदराबाद बससेवा कुंडलवाडीमार्गे सुरू करण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनाची दखल घेत आमदार जितेश अंतापूरकर यांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने नांदेडचे विभागीय वाहतूक नियंत्रक तसेच निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. संबंधित मागण्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यामुळे गोशाळेतील गोवंशासाठी चारा व टिनशेड उपलब्ध होण्यासह नांदेड-हैदराबाद बससेवेचा प्रश्न मार्गी लागण्याबाबत आशा निर्माण झाली आहे.

# रामतीर्थ पोलिसांकडून तीन गोवंशासह एक म्हैस जप्त; ५ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**नायगाव (प्रतिनिधी)–** नरसी येथे गोवंशांची वाहतूक करणाऱ्या पिकअप वाहनावर रामतीर्थ पोलिसांनी कारवाई करत तीन गोवंश आणि एका म्हशीसह एकूण ५ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू असल्याची माहिती सपोनि विक्रम हराळे यांनी दिली आहे.

याबाबत रामतीर्थ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नायगाव येथील जनावरांच्या बाजारातून गोवंश कत्तलीसाठी पिकअप वाहनातून नेले जात असल्याची गोपनीय माहिती रामतीर्थ पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार नरसी येथे पिकअप क्रमांक एमएच २६ सीएच १५४२ हे वाहन थांबवून तपासणी करण्यात आली. यावेळी वाहनात तीन गोवंश आणि एक म्हैस आढळून आली. या जनावरांच्या कानाला अधिकृत ओळख दर्शविणारे एअरटॅग नसल्याचेही निदर्शनास आले.

विशेष म्हणजे, संबंधित पिकअप वाहनाविरुद्ध यापूर्वी देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५६२/२०२४ दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी रामतीर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २२४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम २८१ तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील कलम ११(१)(अ), (ड), (ई) व (ह) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# तिरूपतीसह विविध ठिकाणांसाठी नांदेड विभागातून ५ विशेष रेल्वे

## नांदेड- पानिपत, नांदेड- उधना, जालना- तिरुपती गाड्यांमध्ये आरक्षण उपलब्ध

**नांदेड (प्रतिनिधी)–** सणासुदीच्या काळातील प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने विविध गंतव्यस्थानांसाठी विशेष रेल्वेगाड्या चालविल्या आहेत. प्रवाशांना प्रवासाचे नियोजन करता यावे यासाठी नांदेड विभागातून सुटणाऱ्या निवडक विशेष गाड्यांमधील आरक्षित बर्थच्या उपलब्धतेची माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने जाहीर केली आहे.

दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८ वाजेपर्यंतच्या स्थितीनुसार ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यातील उपलब्धता पुढीलप्रमाणे आहे - गाडी क्र. ०७६३५ हजूर साहिब नांदेड ते पानिपत २७ ऑक्टोबर २०२६ रोजी २१० बर्थ उपलब्ध.

२६ ऑक्टोबर रोजी ६५६, २ नोव्हेंबर रोजी ६४२, ९ नोव्हेंबर रोजी ५९२, १६ नोव्हेंबर रोजी ५३८ आणि २३ नोव्हेंबर रोजी ६०८ बर्थ उपलब्ध.

गाडी क्र. ०७६०१ जालना ते येलहांका २५ ऑक्टोबर रोजी २३७ बर्थ उपलब्ध.

गाडी क्र. ०७८१४ जालना ते तिरुपती २९ ऑक्टोबर रोजी २२४, ५ नोव्हेंबर रोजी ३९५, १९ नोव्हेंबर रोजी २७८ आणि २६ नोव्हेंबर रोजी ६६६ बर्थ उपलब्ध.

गाडी क्र. ०७६०३ हजूर साहिब नांदेड ते तिरुचानूर २७ ऑक्टोबर रोजी ५४८, ३ नोव्हेंबर रोजी ७७९, १० नोव्हेंबर रोजी ४७१, १७ नोव्हेंबर रोजी ६९८ आणि २४ नोव्हेंबर रोजी ८४८ बर्थ उपलब्ध.

वरील उपलब्धता दि. २२ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजेची असून आगाऊ आरक्षणानुसार त्यात बदल होऊ शकतो. त्यामुळे प्रवाशांनी आरक्षणापूर्वी अद्ययावत उपलब्धता तपासावी.

सणासुदीचा प्रवास अधिक सुलभ व नियोजनबद्ध करण्यासाठी विशेष गाड्यांमधील आगाऊ आरक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड विभागाने केले आहे.

# राज्यस्तरीय एनक्यूएएस पथकाकडून बरडशेवाळा आरोग्य केंद्राची पाहणी




**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील बरडशेवाळा आणि कोळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्राला राज्यस्तरीय राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनच्या पथकाने बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी भेट देऊन पाहणी केली.

केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेसह अधिकारी, कर्मचारीवर्गाच्या कामाविषयी माहितीसाठी आरोग्य विभागांच्या संकल्पनेतून राज्यस्तरीय राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन पथकात आरोग्य विभागाच्या स्टेट असिस्टेंट डॉ. रमा बाजुरिया, डीएएम डॉ. प्रीती दुधे, समन्वयक डॉ. व्यंकटेश गुडे, समन्वयक शामसुंदर लोखंडे यांच्या उपस्थितीत बरडशेवाळा प्राथमिक आरोग्य केंद्र भेटीत आरोग्य केंद्रातील विविध आरोग्य सेवा, उपलब्ध सुविधा, स्वच्छता, औषधसाठा, रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवा तसेच आवश्यक नोंदवह्यांची पाहणी करण्यात आली. केंद्रातील आरोग्यविषयक कामकाजाची माहिती संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून घेण्यात आली.

एनक्यूएस अंतर्गत आरोग्य केंद्रांमध्ये दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक बाबींची तपासणी करीत त्यांनी आवश्यक सुचना केली. यावेळी त्यांनी कामाविषयी समाधान व्यक्त करीत आरोग्य केंद्रातील अधिकारी, कर्मचारीवर्गासह पाच पदांपैकी एका परिचकावर असलेल्या परिचर ईस्माईल पिंजारी यांचे आरोग्य केंद्रातील परिसरात स्वच्छतेबद्दल विशेष कौतुक करीत प्रशासन दरबारी आरोग्य केंद्रातील अडचणी सोडवण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचा आशावाद व्यक्त केला.

यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, मुदखेड तालुका आरोग्य अधिकारी शिवशक्ती पवार, हदगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुरमुरे, बरडशेवाळा वैद्यकीय अधिकारी डॉ. एस बी. भिसे, वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल नरवाडे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. आशिष बेरळकर, डॉ. विजय कानोडे, डॉ. अनिता धनवे व आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

# ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे उस्माननगर येथील नागरिकांनी वर्गणीतून दुरुस्त केला हातपंप

## २०० लिटर पाण्यासाठी ४० रुपये मोजावे लागत असल्याचा नागरिकांचा दावा



**नांदेड (प्रतिनिधी)–** कंधार तालुक्यातील उस्माननगर (मोठी लाट) येथील वार्ड क्रमांक ५ मधील अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक भवनासमोरील सार्वजनिक हातपंप गेल्या अनेक महिन्यांपासून बंद पडला होता. ग्रामपंचायत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही दखल न घेतल्याने अखेर परिसरातील मातंग समाजातील नागरिकांनी स्वतः वर्गणी गोळा करून स्वखर्चाने हा हातपंप दुरुस्त केला आहे. या घटनेमुळे उस्माननगरमधील कोलमडलेला पाणीपुरवठा आणि ग्रामपंचायतीची अनास्था पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार वार्ड क्र. ५ मधील अनेक कुटुंबांच्या पिण्याच्या पाण्याचा हा हातपंप एकमेव मुख्य स्रोत आहे. मात्र, तो प्रदीर्घ काळापासून बंद असल्याने परिसरातील महिला व नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. हातपंपाच्या दुरुस्तीसाठी स्थानिक वार्ड सदस्य, सरपंच आणि ग्रामसेवक यांच्याकडे तोंडी तसेच लेखी स्वरूपात अनेकदा निवेदने देण्यात आली. मात्र, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने या गंभीर समस्येकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

हातपंप बंद असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी खाजगी टँकरधारकांवर अवलंबून राहावे लागत होते. २०० लिटर पाण्यासाठी तब्बल ४० रुपये मोजावे लागत असल्याने हातावर पोट असणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला आर्थिक फटका बसत होता. प्रशासनाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहून अखेर मातंग समाजातील नागरिकांनी एकत्र येत स्वतः वर्गणी जमा केली आणि हातपंप पूर्ववत सुरू केला.

सार्वजनिक पाणीपुरवठा आणि त्याची देखभाल-दुरुस्ती करण्याची प्राथमिक जबाबदारी ग्रामपंचायतीची असताना, नागरिकांना स्वतःच्या खिशातून पैसे गोळा करावे लागल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

उस्माननगर ग्रामपंचायतीने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन वार्ड क्र. ५ मधील पाणीपुरवठ्याची त्वरित पाहणी करावी, परिसरातील उर्वरित बंद हातपंपांची दुरुस्ती करून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी मार्गी लावावा, अशी मागणी उस्मानगर येथील ग्रामस्थांमधून केली जात आहे.

# चंदेरी

# ‘नातं संपवण्याचा निर्णय इम्रान खानचाच होता...’

## घटस्फोटाबाबत अवंतिका मलिकच्या जुन्या आठवणी ताज्या



**बॉलिवूड अभिनेता इम्रान खान आणि त्याची माजी पत्नी अवंतिका मलिक यांच्या वैवाहिक नात्याबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. अवंतिका मलिक हिने विवाह आणि घटस्फोटाबाबत मनमोकळेपणाने भाष्य केले. या नात्यातून बाहेर पडण्याचा निर्णय आपण कधीच घेतला नसता, असे सांगतानाच विभक्त होण्याची सूचना इम्रान खाननेच केली होती, असा खुलासाही तिने केला. सोहा अली खानच्या पॉडकास्टमध्ये ती सहभागी झाली होती. वैवाहिक आयुष्यातील चढ-उतार आणि नाते संपुष्टात येण्यामागील परिस्थितीचा तिने खुलासा केला.**

### तरीही मी विभक्त होण्याचा निर्णय घेतला नसता...

विभक्त होण्याबाबत सर्वप्रथम कोणी बोलले, असा प्रश्न अवंतिकाला विचारण्यात आला. त्यावर तिने क्षणाचाही विलंब न करता इम्रान खानचे नाव घेतले. आपण या नात्याचा शेवट करण्याचा विचार कधीच केला नव्हता, असेही तिने स्पष्ट केले. नात्यातून बाहेर पडले नसते, तर कदाचित स्वतःचे नुकसान सहन करावे लागले असते; तरीही आपण विभक्त होण्याचा निर्णय घेतला नसता, असे अवंतिकाने सांगितले. तिच्या मते, नातं संपवण्याचा निर्णय इम्रानचाच होता.

### नातं संपल्याची भावना मोठ्या नुकसानीसारखी

घटस्फोटाच्या काळातील भावनिक वेदना आठवताना अवंतिकाने दीर्घकाळ टिकलेले नाते संपणे म्हणजे आयुष्यातील एखादी महत्त्वाची गोष्ट गमावल्यासारखे असल्याचे सांगितले. दोघे विभक्त झाले, तेव्हा आयुष्यातील एक महत्त्वाचा भाग संपल्याची भावना मनात निर्माण झाली होती, असे तिने नमूद केले. अवंतिका आणि इम्रान यांची ओळख झाली, तेव्हा अवंतिका अवघ्या १९ वर्षांची होती. दोघांनी २०११ मध्ये विवाह केला. त्यानंतर त्यांना इमारा नावाची मुलगी झाली. अनेक वर्षे एकत्र संसार केल्यानंतर २०१९ मध्ये दोघांचे मार्ग वेगळे झाले. काही काळ विभक्त राहिल्यानंतर त्यांचा घटस्फोट कायदेशीररीत्या अंतिम झाला.

### नात्यातील अतिअपेक्षा ठरू शकतात त्रासदायक



कमी वयात नात्यात गुंतल्यानंतर स्वतःच्या आनंदाची आणि समाधानाची जबाबदारीही स्वतःची असते याची जाणीव अनेकदा नसते, असे अवंतिकाने सांगितले. समोरची व्यक्तीच आपल्या सर्व आनंदासाठी जबाबदार आहे, अशी अपेक्षा ठेवली जाते. मात्र, वय वाढल्यानंतर आणि अनुभवातून शिकताना या अपेक्षांचा पुनर्विचार करणे आवश्यक असल्याचे लक्षात येते. नात्यात समोरच्या व्यक्तीकडून गरजेपेक्षा जास्त अपेक्षा ठेवल्यास त्याचा संबंधावर विपरीत परिणाम होऊ शकतो. वय आणि अनुभव वाढत जातात, तसतसा नातेसंबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलत जातो, असे तिने स्पष्ट केले.

### नातं तुटण्यामागे एखादी मोठी घटना नव्हती

आपल्या विवाहाचा शेवट होण्यामागे एखादी मोठी घटना किंवा विशिष्ट कारण नव्हते, असे अवंतिकाने सांगितले. जवळपास १८ वर्षे एकत्र राहिल्यानंतर दोघांकडूनही काही चुका झाल्या असण्याची शक्यता तिने व्यक्त केली. दोघांनी कमी वयात एकत्र आयुष्य सुरू केले. वयाच्या विशीतून तिशीच्या सुरुवातीपर्यंतच्या काळात त्यांनी अनेक अनुभव घेतले. या प्रवासात नात्यातील लहानसहान गोष्टींमुळे हळूहळू अंतर वाढले असावे, असे तिला वाटते. त्यामुळे नातं तुटण्यासाठी केवळ एकाच व्यक्तीला जबाबदार धरणे योग्य ठरणार नाही, असेही तिने नमूद केले. या काळात दोघांनीही कुठे ना कुठे एकमेकांवर अन्याय केला, अशी कबुली अवंतिकाने दिली. बालपणापासून ते प्रसिद्धी, यश आणि अपयशापर्यंतच्या आयुष्यातील अनेक टप्प्यांचे साक्षीदार ते एकत्र झाले होते. त्यामुळे नातं संपल्याचे दुःख असले, तरी एकत्र केलेल्या प्रवासाबद्दल आपल्याला अभिमान असल्याचे तिने म्हटले.

### नातं पूर्णपणे अयशस्वी ठरलं नाही...



ज्या पद्धतीने त्यांचे नाते संपुष्टात आले, त्यामुळे निराश झाल्याचे अवंतिकाने मान्य केले. मात्र, दोन व्यक्तींनी जवळपास १८ वर्षे एकत्र राहून नातं टिकवण्यासाठी आपापल्या परीने सर्वोत्तम प्रयत्न केले आणि मिळून एक कुटुंब उभे केले, तर त्या नात्याला पूर्णपणे अयशस्वी म्हणता येणार नाही, असे तिचे मत आहे. नात्याचा शेवट झाला म्हणून त्यातील सर्व अनुभव आणि आठवणी व्यर्थ ठरत नाहीत. एकत्र घालवलेला काळ, घेतलेले अनुभव आणि कुटुंब उभे करण्यासाठी केलेले प्रयत्न यांनाही महत्त्व आहे, अशी भावना अवंतिकाच्या वक्तव्यातून व्यक्त झाली.

# अत्याचारांच्या घटना अस्वस्थ करतात; भयभीत-दबलेल्या भूमिका आवडत नाहीत

## फातिमा सना शेख हिची विशेष मुलाखत

## स्त्री-पुरुष समानतेचा अर्थ समजून घेण्याचे आवाहन

**बॉलिवूड अभिनेत्री फातिमा सना शेख सध्या ‘हुंकार : द रोर’ या वेबमालिकेतील सहायक पोलीस आयुक्त जसलीन या भूमिकेमुळे चर्चेत आहे. अन्यायाविरुद्ध उभे राहणाऱ्या आणि सत्याची बाजू घेणाऱ्या सशक्त स्त्रियांच्या भूमिका साकारण्याकडे आपला अधिक कल असल्याचे तिने सांगितले. मुलींवरील अत्याचारांच्या घटना आपल्याला वैयक्तिक पातळीवर अस्वस्थ करतात, असेही तिने स्पष्ट केले. विशेष मुलाखतीत फातिमाने आपल्या अभिनयप्रवासासह स्त्रियांचे प्रश्न, स्त्री-पुरुष समानता आणि चित्रपटांमधील व्यक्तिरेखांविषयी मनमोकळेपणाने संवाद साधला.**



‘दंगल’ चित्रपटात कुस्तीपटू गीता फोगाटची दमदार भूमिका साकारून फातिमाने बॉलिवूडमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यानंतर ‘ठग्स ऑफ हिंदोस्तान’मधील योद्धा राजकन्या झाफिरा, ‘मॉडर्न लव्ह मुंबई’मधील लालजरी, ‘धक धक’मधील दुचाकीप्रेमी स्काय आणि ‘सॅम बहादूर’मधील इंदिरा गांधी अशा विविध भूमिका तिने साकारल्या आहेत. आता ‘हुंकार : द रोर’ या मालिकेत ती आव्हानांना सामोरे जात सत्याची बाजू घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसत आहे. पडद्यावरील आपल्या भूमिकांविषयी बोलताना फातिमा म्हणाली, की “मला नेहमीच सशक्त व्यक्तिरेखांचे आकर्षण वाटते. भित्र्या किंवा सतत दबलेल्या अवस्थेत असलेल्या मुलींच्या भूमिका मला फारशा आवडत नाहीत. अर्थात, आपल्याला ज्या भूमिका करण्याची संधी मिळते, त्यातूनच निवड करावी लागते. मात्र, माझा कल आपोआपच सशक्त व्यक्तिरेखांकडे असतो. मला चांगल्या भूमिका मिळाल्या, हे माझे भाग्य आहे.” ‘हुंकार : द रोर’ या मालिकेत आपण पहिल्यांदाच पोलिसाची भूमिका साकारत असल्याचेही तिने सांगितले. या मालिकेतील जसलीन या व्यक्तिरेखेची पार्श्वभूमी आपल्याला विशेष भावल्यामुळे ही भूमिका स्वीकारल्याचे तिने स्पष्ट केले.

### ‘मुलींवरील अत्याचारांच्या घटना मन अस्वस्थ करतात...’

या मालिकेत फातिमा एका धर्मगुरूकडून लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या अल्पवयीन मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करताना दिसते. समाजात मुलींवरील अत्याचाराच्या घटना सातत्याने घडत असताना, अशा अन्यायाविरुद्ध आपण कोणत्या सामाजिक प्रश्नासाठी आवाज उठवू इच्छितो, असा प्रश्न तिला विचारण्यात आला. त्यावर ती म्हणाली, “आपण म्हटल्याप्रमाणे, अशा प्रकारच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडतात. त्या कालही घडत होत्या आणि आजही घडत आहेत. अशा घटना कोणत्याही संवेदनशील व्यक्तीला निश्चितच अस्वस्थ करतात. त्यामुळे जेव्हा एखाद्या व्यक्तिरेखेतून सत्याच्या बाजूने उभे राहण्याची आणि न्यायासाठी लढण्याची संधी मिळते, तेव्हा योग्य गोष्टीचे प्रतिनिधित्व करण्याची संधीही मिळते.” अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या व्यक्तिरेखा साकारताना केवळ अभिनय करण्यापुरते मर्यादित न राहता, योग्य मूल्यांची बाजू मांडता येते, असे तिच्या वक्तव्यातून स्पष्ट होते.

### ‘स्त्रीवाद म्हणजे समान हक्कांची मागणी’

स्त्रीवादाचा अर्थ पुरुषांची जागा घेणे असा नसून, स्त्रियांना समान हक्क मिळावेत, ही त्यामागील भूमिका असल्याचे फातिमाने स्पष्ट केले. ती म्हणाली, “स्त्रीवाद म्हणजे समान हक्कांची मागणी. याचा अर्थ असा नाही की मला तुमची जागा घ्यायची आहे. मला तसे करायचेही नाही. स्त्री आणि पुरुष यांच्यात फरक आहेत. आपली बलस्थाने आणि कमकुवत बाजू वेगवेगळ्या असू शकतात. मात्र, दोघांनी एकत्र येऊन वाटचाल केली, तर समाज अधिक चांगला होऊ शकतो.” समाजाच्या प्रगतीसाठी स्त्री आणि पुरुष या दोघांचाही सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगताना ती म्हणाली, की “समाजातील एका घटकाला मागे सोडून दिले, तर आपण एकटे किती पुढे जाऊ शकणार आहोत? सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्यातच समाजाचे हित आहे.” स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, सशक्त स्त्री-व्यक्तिरेखांना प्राधान्य देणे आणि स्त्री-पुरुष समानतेचा व्यापक अर्थ समजून घेणे, या मुद्द्यांवर फातिमा सना शेखने या मुलाखतीत ठाम भूमिका मांडली.

### ‘स्त्रीवादाचा खरा अर्थ अनेकांना समजलेला नाही’

सध्या समाजातील काही लोक स्त्रीवादाकडे नकारात्मक दृष्टिकोनातून पाहतात आणि तो समाजात फूट पाडणारा विचार असल्याचे मानतात. याबाबत फातिमाने आपले स्पष्ट मत मांडले. ती म्हणाली, “हा गैरसमज आहे. स्त्रीवादाचा खरा अर्थ काय आहे आणि तो स्त्रिया तसेच पुरुषांसाठी काय करतो, हे अनेकांना समजलेले नाही. लोकांनी त्याबद्दल थोडे समजून घेण्याचा प्रयत्न केला, तर ते आपोआपच त्याच्या बाजूने उभे राहतील.” स्त्रीवादाला विरोध करणाऱ्यांना समाजाकडून पाठिंबा मिळत असल्यामुळेही हा गैरसमज कायम राहत असल्याचे तिने नमूद केले.



# ...म्हणून अक्षय खन्ना राहतो लोकांपासून दूर!

## म्हणाला, लोकांना समजून घ्यायला आवडतं, पण कौशल्य नाही...

**बॉलिवूड अभिनेता अक्षय खन्ना आपल्या दमदार अभिनयासाठी जितका ओळखला जातो, तितकाच तो आपल्या खासगी आयुष्याबाबत गोपनीयता जपण्यासाठीही प्रसिद्ध आहे. समाजमाध्यमांवरील अनुपस्थिती, चित्रपटांच्या प्रसिद्धी कार्यक्रमांपासून दूर राहण्याची वृत्ती आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये कमी उपस्थिती यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाबाबत नेहमीच कुतूहल व्यक्त केले जाते. मात्र, एका मुलाखतीत अक्षयने आपल्या स्वभावातील काही पैलू उलगडले. आपण जाणीवपूर्वक असे सर्वांपासून दूर राहतो. जवळच्या व्यक्तींच्या भावनांबाबत आपण अतिशय संवेदनशील आहोत, असे त्याने सांगितले.**

अभिनेत्री सिमी गरेवाल यांच्या चर्चात्मक कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर अक्षयने स्वभावाविषयी मनमोकळेपणाने भाष्य केले होते. या संवादात त्याने लोकांशी असलेले संबंध, इतरांच्या भावनांची जाणीव आणि चुकांनंतर माफी मागण्याबाबतचे विचार व्यक्त केले. अक्षय खन्नाच्या व्यक्तिमत्त्वातील गूढपणाबाबत बोलताना सिमी गरेवाल यांनी तो स्वतःभोवती एक प्रकारची भिंत उभी करतो. त्यामुळे लोक त्याच्यापासून दूर राहतात, असे निरीक्षण नोंदवले. त्यावर अक्षय म्हणाला, की “कदाचित आता मी माझ्याभोवतीच्या त्या भिंती थोड्या पारदर्शक करू लागलो आहे; मात्र त्या अजूनही अस्तित्वात आहेत.” त्याच्या या वक्तव्यातून स्वतःच्या खासगी आयुष्याभोवती मर्यादा ठेवण्याची त्याची वृत्ती स्पष्ट झाली. आपण भावनिकदृष्ट्या संवेदनशील आहात का, असा प्रश्न सिमी गरेवाल यांनी विचारला असता अक्षयने त्याला होकार दिला. तो म्हणाला, की “जे लोक माझ्या अतिशय जवळचे आहेत, त्यांच्या बाबतीत मी खूप संवेदनशील असतो. त्यांनी सहजपणे बोललेली एखादी छोटीशी गोष्टही माझ्या मनावर खोलवर परिणाम करू शकते.” जवळच्या व्यक्तींच्या बोलण्याचा आणि वागण्याचा आपल्यावर भावनिक परिणाम होत असल्याचे त्याने स्पष्ट केले.



### मन दुखावण्याची इच्छा नसते...

इतरांचे मन दुखावण्याची आपली इच्छा नसते; मात्र, काही वेळा नकळत तसे घडते, अशी कबुलीही अक्षयने दिली. तो म्हणाला, की “मला कोणाचेही मन दुखवायचे नसते. मात्र, कधीकधी नकळत तसे घडते. नंतर मला त्याचा पश्चात्ताप होतो आणि मी विचार करतो की पुन्हा असे करणार नाही. पण कधीकधी चूक होतेच. मी स्वतः खूप संवेदनशील असल्यामुळे इतरांच्या भावनांबाबतही विशेष काळजी घेतो.” या वक्तव्यातून स्वतःच्या वागण्याचे आत्मपरीक्षण करण्याची आणि इतरांच्या भावनांचा आदर करण्याची त्याची भूमिका दिसून आली होती. चूक झाल्यानंतर माफी मागण्याबाबतही अक्षयने स्पष्ट मत मांडले होते. त्याच्या मते, माफी मागणे ही चांगली गोष्ट असून त्यामुळे मनावरील ओझे हलके होते. तो म्हणाला होता, “माफी मागणे ही खूप चांगली गोष्ट आहे. ते अगदी सोपे आहे आणि त्यामुळे तुम्हालाही हलके वाटते.” चूक मान्य करून माफी मागण्यात कमीपणा नसतो, असा दृष्टिकोन त्याच्या या विधानातून व्यक्त झाला होता.

### ‘लोकांना भेटायला आवडते; पण सहज जमत नाही...’



अक्षय खन्ना स्वतःच्या इच्छेने अंतर्मुख राहत नाही, असेही त्याने या मुलाखतीत स्पष्ट केले होते. लोकांना भेटणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि त्यांना समजून घेणे आपल्याला आवडते; मात्र, हे सर्व सहजपणे करता येत नाही, असे त्याने सांगितले होते. तो म्हणाला होता, “मला लोकांना भेटायला आणि त्यांना समजून घ्यायला आवडते. मात्र, हे करण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता किंवा कौशल्य माझ्याकडे नाही.” एखादी गोष्ट करायची इच्छा नसणे आणि ती गोष्ट करण्याची क्षमता नसणे, या दोन वेगवेगळ्या बाबी असल्याचेही त्याने नमूद केले होते.

### स्वभावामागे अहंकार नव्हे, तर व्यक्तिमत्त्वातील संकोच

अक्षय खन्ना लोकांपासून अंतर राखतो, अशी त्याची सार्वजनिक प्रतिमा आहे. मात्र, त्याच्या जुन्या मुलाखतीतील विधानांवरून लोकांशी संवाद साधण्याची इच्छा असूनही ते सहजपणे जमत नसल्याचे त्याने स्वतः मान्य केले. जवळच्या व्यक्तींबाबतची संवेदनशीलता, चूक झाल्यानंतर होणारा पश्चात्ताप आणि माफी मागण्याची तयारी हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे पैलू या संवादातून समोर आले होते. त्यामुळे त्याच्या अलिप्त स्वभावाकडे केवळ अहंकाराच्या दृष्टिकोनातून न पाहता, त्यामागील व्यक्तिमत्त्व समजून घेणेही महत्त्वाचे ठरते.

# रितेश देशमुखचा तेलुगू चित्रपटसृष्टीत प्रवेश!



बॉलिवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीत अभिनयाचा ठसा उमटवणारा अभिनेता रितेश देशमुख आता तेलुगू चित्रपटसृष्टीत पदार्पण करणार आहे. तेलुगू सुपरस्टार राम पोथिनेनी याच्या आगामी चित्रपटात रितेश दिसणार आहे. ‘RAPO23’ असे तात्पुरते नाव असलेल्या या चित्रपटात अभिनेत्री संयुक्ताही महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी रितेशचे चित्रपटाच्या टीममध्ये स्वागत केले. या घोषणेमुळे रितेशच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. या चित्रपटातून तो प्रथमच तेलुगू चित्रपटात काम करणार आहे. निर्मिती संस्थेने चित्रपटाच्या पडद्यामागील काही क्षणांचा व्हिडीओही प्रसिद्ध केला आहे. या व्हिडीओमध्ये चित्रपटाच्या चित्रीकरणस्थळाची झलक पाहायला मिळते. रितेशचे चित्रीकरणस्थळी आगमन आणि राम पोथिनेनीसोबत त्याची चर्चा यांची दृश्ये त्यात आहेत. मात्र, या व्हिडीओमध्ये रितेशचा चेहरा दाखवण्यात आलेला नाही.

### अत्यंत वेधक आणि रोमांचक भूमिका

‘रापो सिनेमॅटिक्स’ या निर्मिती संस्थेने समाजमाध्यमांवरील पोस्टद्वारे रितेशचे स्वागत केले. “अत्यंत वेधक आणि रोमांचक भूमिकेसाठी अष्टपैलू कलाकार रितेश देशमुखचे स्वागत. ‘RAPO23’ च्या नव्या चित्रीकरण सत्राला सुरुवात झाली आहे.” अशा आशयाची पोस्ट निर्मात्यांनी प्रसिद्ध केली. राम पोथिनेनी या चित्रपटात मुख्य भूमिका साकारण्याबरोबरच दिग्दर्शनाची जबाबदारीही सांभाळत आहे. एक वेगळ्या धाटणीचा मानसशास्त्रीय ॲक्शन थ्रिलर असल्याचे सांगितले जात आहे.

# मनोज जरांगेंना ऑडिओ क्लीप कुठून मिळाली? भाजपच्या विधान परिषदेच्या आमदारानेच फोडली -संजय राऊत



**मुंबई (प्रतिनिधी)–** मनोज जरांगे यांनी नुकतीच एक ऑडिओ क्लीप समोर आणून महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून दिली होती. भाजपच्या अंतर्गत वर्तुळातील संभाषणाची ही क्लीप मनोज जरांगे यांना कुठून मिळाली, असा प्रश्न त्यानंतर सर्वांना पडला होता. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक महत्त्वाचा दावा केला आहे. ती ऑडिओ टेप भाजपच्या विधान परिषदेच्या आमदारानेच फोडली. तो आमदार मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावेळी सतता त्यांच्यासोबत चर्चेसाठी असायचा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हा आमदार कोण, हे माहिती आहे, असेही संजय राऊत यांनी म्हटले. ते शनिवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत, गृहमंत्री आहेत, ते छोटे चाणक्य आहेत. त्यांना समजले पाहिजे. ऑडिओ क्लीपमध्ये ज्या लोकांमध्ये संभाषण सुरु आहे, ती भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांची कोअर टीम आहे. मुख्यमंत्र्यांना वाटत नाही का या प्रकरणात एसआयटी स्थापन करुन चौकशी झाली पाहिजे. भाजपची कोअर टीम बोलतेय की, ५०० कोटी रुपये दिले. मुख्यमंत्री कुणाला वाचवत आहेत? एकमेकांना अडचणीत आणण्यासाठी क्लीपचा वापर होत आहे. ५०० कोटींचा व्यवहार होऊनही चौकशी होणार नाही. मुंडवा जमीन प्रकरणात सुनेत्रा पवार कार्यालयातील अधिकार यांना समन्स येतो मग पाचशे कोटी प्रकरणात गुन्हा का दाखल होत नाही?, असा सवाल संजय राऊत यांनी उपस्थित केला.

भाजपचे अंतर्गत संभाषण रेकॉर्ड होतं, म्हणजे गृहखातं तुमच्या विरोधात गेले आहे. आधी ते आमचे फोन टॅप करायचे, आता तुमचे फोन टॅप केले जात आहेत. आमचे फोन रेकॉर्ड केले जातात, तेव्हा फॉरेन्सिक लॅब टेस्ट होतात का?मनोज जरांगे हे मुख्य पात्र आहेत, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यासह बाकी सर्व या प्रकरणातील एक्स्ट्रा कलाकार आहेत. या ऑडिओ क्लीपची चौकशी होईल, असे मुख्यमंत्री सांगत आहेत. मात्र, ते खोटे बोलत आहेत. टेप कुणी फोडली हा महत्वाचा मुद्दा आहे. मुख्यमंत्र्यांना टेप फोडणारा आमदार माहिती आहे, असेही संजय राऊत यांनी म्हटले.

ऑडिओ क्लीपच्या निमित्ताने भाजप आणि शिवसेना एकमेकांच्या छातीवर आणि पाठीवर वार करताना दिसत आहेत. दोघांमधील युद्ध शिगेला पोहोचले आहे. हे युद्ध कोणत्याही थराला जाईल. शिंदेंचे मंत्री म्हणतात, आडवे आले तर नायनाट होईल. टेपमध्ये जे बोलत आहेत, ती फडणवीस यांची कोअर टीम आहे. भाजपमध्ये अंतर्गत दुफळी माजली आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचं पानीपतचं युद्ध सुरु झाले आहे, आता पानिपत कोणाचं होतं, हे कळेल. पुढच्या महिन्यात कळेल कुणाचा शेवट होतो, असे संजय राऊत यांनी म्हटले.

## 'ती' ऑडिओ क्लीप 'सामना'च्या स्टुडिओत तयार झाली -प्रसाद लाड यांचा दावा

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी भाजपच्या अंतर्गत वर्तुळातील ऑडिओ क्लीप ही संजय राऊत यांनी तयार करवून घेतली आहे. दैनिक 'सामना'च्या कार्यालयातील स्टुडिओत ही बनावट ऑडिओ क्लीप तयार करण्यात आली. त्यामुळे पोलिसांनी संजय राऊत यांना उचलून त्यांची चौकशी केली पाहिजे, अशी मागणी भाजप आमदार प्रसाद लाड यांनी केली. प्रसाद लाड यांनी 'सामना'च्या स्टुडिओत जाऊन या सगळ्याची चौकशी केला पाहिजे, असेही म्हटले आहे. यावरुन आता ठाकरे गट आक्रमक होण्याची शक्यता आहे.

# पुंछमध्ये संशयास्पद स्फोटक साहित्याचे ७ कंटेनर जप्त; सुरक्षा दलांची संयुक्त शोधमोहीम



**पुंछ (वृत्तसंस्था)–** जम्मू-काश्मीरमधील सीमावर्ती पुंछ जिल्ह्यात सुरक्षा दलांनी एका संयुक्त शोधमोहिमेदरम्यान संशयित दहशतवादी अड्ड्यावरून स्फोटक साहित्याचे सात कंटेनर जप्त केले आहेत. मेंढर तहसीलमधील कसबलारी परिसरात शुक्रवारी ही कारवाई करण्यात आली. जप्त केलेल्या साहित्यात आयईडी असण्याची दाट शक्यता वर्तवली जात असून, या कारवाईमुळे सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. गेल्या काही दिवसांत या भागात शस्त्रसाठा सापडण्याच्या घटना वाढल्या आहेत.

मेंढर तहसीलमधील कसबलारी परिसरात १५६ टेरिटोरियल आर्मीने दिलेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही संयुक्त शोधमोहीम राबवण्यात आली. शुक्रवारी हाती घेतलेल्या या मोहिमेदरम्यान सुरक्षा दलांना टेपने गुंडाळलेले सात कंटेनर आढळून आले, ज्यामध्ये इम्प्रोव्हाइज्ड एक्स्प्लोसिव्ह डिव्हाइस असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

या कारवाईदरम्यान केवळ कंटेनरच नव्हे, तर इतर संशयास्पद साहित्यही हाती लागले आहे. यामध्ये एक काळी बॅग, कॉम्बॅट पाउच, काळ्या रंगाची लोखंडी पेटी, एक बंदूक मॅगझिन, एक ॲल्युमिनियम कंटेनर, दोन पॉवर अडॅप्टर आणि एका टिफिनचा समावेश आहे. प्राथमिक तपासानुसार, जप्त केलेले मॅगझिन ७.६२ मिमी एलएमजीशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या साहित्याची नेमकी तीव्रता आणि त्यातील स्फोटकांची उपस्थिती याबाबतचा अंतिम निष्कर्ष तांत्रिक तपासणीनंतरच स्पष्ट होईल.

पुंछ आणि राजौरी या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये गेल्या दहा दिवसांत शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्याची ही चौथी घटना आहे. याआधी राजौरीतील चोर हिल जंगल परिसर आणि पुंछमधील साब्जियां भागातही असे साठे सापडले होते. तसेच, विजयादशमीच्या दिवशी पुंछमधील एका मंदिराच्या छतावर ग्रेनेड आढळल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. पुंछची दुर्गम भौगोलिक परिस्थिती आणि नियंत्रण रेषेवरील जवळीक यामुळे हा परिसर नेहमीच संवेदनशील मानला जातो.

# राजस्थानमध्ये नाशिकच्या भाविकांच्या वाहनाचा भीषण अपघात; ४ जणांचा मृत्यू

**जयपुर (वृत्तसंस्था)–** राजस्थानमधील जयपूर येथे नाशिक जिल्ह्यातील भाविकांच्या वाहनाला पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या अपघातात सटाणा तालुक्यातील अजमेर सौंदाणे येथील ४ भाविकांचा मृत्यू झाला असून, अन्य काही भाविक गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. या घटनेमुळे नाशिक जिल्ह्यातील सटाणा परिसरात शोककळा पसरली आहे.

अपघाताची माहिती मिळताच नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी मदतकार्याबाबत तातडीने पाठपुरावा केला. त्यांनी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून अपघाताची माहिती घेतली. अपघातात मृत्यू झालेल्या भाविकांचे शवविच्छेदन लवकरात लवकर पूर्ण करून त्यांचे पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना देण्याची विनंती महाजन यांनी राज्यपालांकडे केली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या भाविकांना तातडीने जवळच्या योग्य रुग्णालयात दाखल करून त्यांच्यावर आवश्यक उपचार करावेत, तसेच सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही महाजन यांनी केली.

मंत्री महाजन यांच्या माहितीनुसार, राजस्थानच्या राज्यपाल कार्यालयाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. जखमींना आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांच्या उपचारांवर लक्ष ठेवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यरत असल्याची माहिती राज्यपाल कार्यालयाकडून देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

राजस्थानमध्ये धार्मिक यात्रेसाठी गेलेल्या भाविकांवर ओढवलेल्या या संकटामुळे अजमेर सौंदाणे गावासह सटाणा तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, जखमी भाविक लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना केली जात आहे. अपघाताचे नेमके कारण, जखमींची संख्या आणि त्यांची प्रकृती याबाबत अधिकृत माहिती मिळाल्यानंतर पुढील तपशील स्पष्ट होणार आहेत.

# पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक, ऊस दराबाबत तोडगा नाहीच; स्वाभिमानीचं आंदोलन सुरूच राहणार



**कोल्हापूर (प्रतिनिधी)–** यंदाचा गळीत हंगाम सुरू झाला असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून ५००० रुपयांच्या भावाची मागणी केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज ऊसदराच्या तोडग्यासाठी कोल्हापुरात शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी आणि राज्य सराकरमधील मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यात बैठक सुरू आहे. या बैठकीला शेतकरी संघटना प्रतिनिधी आणि कारखानदारांची देखील उपस्थिती आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली, मात्र अद्यापही ऊसदराच्या मागणीवर तोडगा निघाला नाही. पहिली उचल ४५०० रुपये मिळावी, या मागणीवर शेतकरी संघटना ठाम असल्याचे दिसून आले.

कोल्हापुरातील या बैठकीला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी, कारखानदार आणि माजी खासदार संजय मंडलिक, कारखानदार आणि आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. यंदा ऊसाला पहिली उचल ५ हजार देण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेची आहे. दर जाहीर केल्याशिवाय कारखाने सुरू करु देणार नसल्याचा इशाराही स्वाभिमानीने दिला आहे. मात्र, आजच्या बैठकीत या मागणीवर तोडगा निघाला नसल्याचे पाहायला मिळते. कोल्हापुरातील ऊस दराच्या प्रश्नावर झालेल्या बैठकीत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि साखर कारखानदारांची बैठक पार पडली. मात्र, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिली उचल ४ हजार ५०० रुपये मिळावी, या मागणीवर स्वाभिमानी शेतकरी संघटना ठाम आहे. जोपर्यंत ऊस दर जाहीर होत नाही, तोपर्यंत साखर कारखाने सुरू करू देणार नाही, अशी भूमिका माजी खासदार राजू शेट्टी यांनी घेतली आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील इतर कारखानदारांशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्याची भूमिका कारखानदारांनी मांडली आहे. आजची बैठक प्राथमिक स्वरूपाची असून, येत्या दोन दिवसांत पुन्हा बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. त्यामुळे ऊस दराचा तिढा कायम असून, स्वाभिमानीचं आंदोलन सुरूच राहणार आहे.

# मुंबई विमानतळावर २.२९ किलो सोने जप्त, चौघांना अटक

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सोन्याची तस्करी करणाऱ्या टोळीला महसूल गुप्तवार्ता संचालनालयने अटक केली आहे. उऴख ने केलेल्या कारवाईमध्ये २४ कॅरेटच्या परदेशी बनावटीचे सोन्याचे बिस्किटच जप्त केले आहेत. शुक्रवारी एका बांग्लादेशी नागरिकासह आणखी तिघांना महसूल गुप्तवार्ता संचालनालयाने अटक केलेली आहे. अधिकाऱ्यांनी आरोपींकडून २.२९ किलो इतके सोनेही जप्त केले आहे. या सोन्याची सध्याच्या बाजारभाव किंमतीनुसार, ३ कोटींच्या आसपासची किंमत आहे.

बांगलादेशी नागरिक मोहम्मद जिनाथ होसेन, मुंबईतील सांताक्रूझमध्ये राहणारा व्हीजे केवट, जबलपुरमध्ये राहणारा एससी डोंगरे आणि उल्हासनगरमध्ये राहणारा एसटी माखिजा अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

डीआरआयच्या सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विशिष्ट गुप्त माहितीनुसार दुबईहून मुंबई प्रवास करणारा मोहम्मद जिनाथ होसेन नावाचा ट्रान्झिट प्रवासी तस्करीचे सोने घेऊन जाणार होता आणि ते आंतरराष्ट्रीय निर्गमन क्षेत्रात विमानतळावरील एका कर्मचाऱ्याकडे सुपूर्द करणार होता. डीआरआय पथकाने त्या दोघांना अडवले. चौकशीदरम्यान, केवटने सांगितले की त्याला होसेनकडून मेणाच्या स्वरूपातील सोन्याची एक कॅप्सूल असलेला एक मोजा मिळाला होता. केवटच्या केलेल्या तपासणीमध्ये, सोन्याच्या चार कॅप्सूल असलेला एक लगडी सापडली.

# ख्राईस्टचर्चमध्ये न्यूझीलंडवर भारताचा सलग दुसरा विजय

**ख्राईस्टचर्च (वृत्तसंस्था)–** भारतीय संघाने ख्राईस्टचर्च येथे झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी२० सामन्यात अशक्य वाटणारा विजय शक्य करून दाखवला आहे. शनिवारी खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव केला. एक वेळ अशी होती की यजमान न्यूझीलंड संघ सहज जिंकेल असे वाटत होते, कारण भारताला शेवटच्या ३ षटकांत ४६ धावांची गरज होती आणि ६ फलंदाज बाद झाले होते. मात्र, तिलक वर्मा आणि नितीश रेड्डी यांनी ७ व्या विकेटसाठी अवघ्या ३० चेंडूत नाबाद ६९ धावांची वादळी भागीदारी करत भारताला हारलेला सामना जिंकवून दिला.

या विजयासह भारतीय संघाने मालिकेमध्ये २-० अशी भक्कम आघाडी घेतली आहे. भारताची सुरुवात अत्यंत खराब झाली होती. संजू सॅमसन (१४), वैभव सूर्यवंशी (०४), कर्णधार श्रेयस अय्यर (०७) आणि अभिषेक शर्मा (२७) हे प्रमुख फलंदाज स्वस्तात बाद झाले. अवघ्या ७० धावांवर ५ विकेट्स गमावल्यामुळे भारताचा पराभव निश्चित मानला जात होता. परंतु, तिलक आणि नितीश यांनी सामना पूर्णपणे फिरवला.

सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या तिलक वर्माने अवघ्या २६ चेंडूंत ६ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने नाबाद ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली. तर क्रमांक ७ वर आलेल्या नितीश रेड्डीने १३ चेंडूंत १ चौकार आणि १ षटकारासह नाबाद २६ धावा कुटल्या. दोन्ही फलंदाजांनी पहिल्या चेंडूपासूनच आक्रमक फटकेबाजी करत न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर दबाव आणला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने २० षटकांत ५ गडी गमावून १८० धावा केल्या होत्या. न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सने ४३ चेंडूंत ४ चौकार आणि ४ षटकारांसह सर्वाधिक ७० धावांची खेळी केली, तर बेव्हॉन जॅकोब्सने ५८ धावांचे योगदान दिले. भारताकडून गोलंदाजीत अर्शदीप सिंगने २ बळी घेतले.

१८१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाने १९.५ षटकांत ६ गडी गमावून विजय मिळवला. न्यूझीलंडकडून मिचेल सँटनरने उत्कृष्ट गोलंदाजी करत सर्वाधिक ४ बळी घेतले. मात्र, मोक्याच्या क्षणी तिलक वर्मा आणि नितीश रेड्डी यांच्यातील भागीदारीने न्यूझीलंडच्या हातातून विजय हिसकावून घेतला.

केबीसीत लाखो जिंकला, पण दुष्काळात हरला

# मराठवाड्यातील शेतकऱ्याची व्यथा, विहीर कोरडी, डोळ्यात पाणी

**छ. संभाजीनगर (प्रतिनिधी)–** केबीसीमध्ये गड्याने ५० लाख रुपये जिंकले पण दुष्काळासमोर मात्र हा शेतकरी हरला. कापसाला बोंडं नाहीत, सोयाबीनला दाणे नाहीत, विहीर खोदली, पण पाणी नाही. शेतीत पैसा घातला, पण हातात काहीच उरलं नाही. पैठण तालुक्यातल्या गावतांडा गावचे कैलास कुंटेवार यांची ही कहाणी. पण ही केवळ एका शेतकऱ्याची व्यथा नाही. तर, मराठवाड्यात आज असे कितीतरी शेतकरी आहेत, ज्यांची पिकं डोळ्यांदेखत करपली, ज्यांचा शेतीचा खर्च वाया गेला आणि ज्यांच्यासमोर आता कुटुंबाचा गाडा कसा हाकायचा, हा प्रश्न उभा आहे. केबीसीतून मिळालेल्या पैशांनी कैलास यांनी स्वप्नं पाहिली, पण दुष्काळानं त्या स्वप्नांवर पाणी फेरल्याचं विदारक चित्र पाहायला मिळत आहे.

बिग बी अमिताभ बच्चन यांच्यासमोर हॉटसीटवर बसून कौन बनेगा करोडपती म्हणजेच केबीसीमध्ये ५० लाख रुपये जिंकणारे पैठण तालुक्यातल्या गावतांडा गावचे शेतकरी कैलास कुंटेवार. अवघी दोन एकर शेती... कधी स्वतःच्या शेतात राबायचं, तर कधी दुसऱ्याच्या शेतात मजुरी करून घर चालवायचे. केबीसीत पैसे जिंकल्यानंतर आता आपले दिवस बदलतील, अशी आशा त्यांना वाटली. त्याच पैशातून शेतीत गुंतवणूक केली, विहीर खोदली पण विहिरीला पाणी लागलं नाही. कापसाची लागवड केली, पण बोंडं लागली नाहीत, यंदा सोयाबीनही हातचं गेलं. म्हणजे पैसा घालूनही पदरात काहीच पडलं नाही. ज्या शेतीतून कुटुंबाचं भविष्य घडवायचं होतं, त्याच शेतीनं आज कैलास यांना संकटात आणलंय. केबीसीमध्ये जिंकलेले पैसे शेतीत लावले, पण यंदाच्या दुष्काळानं, निसर्गाच्या मारानं कैलास यांचं सगळं गणितच बिघडून टाकलंय.

कैलास यांची ही अवस्था पाहिली, तर दुष्काळानं शेतकऱ्याला कुठं आणून ठेवलंय, याची कल्पना येते. पेरणीसाठी पैसा लागतो, बियाणं लागतं, खतं आणि औषधं लागतात. शेतकरी पदरमोड करून, कधी उसनवारी करून शेतात पीक उभं करतो. पण, पाऊस साथ देत नाही, पाण्याची सोय होत नाही आणि अख्खं पीक हातातून जातं. मग केलेला खर्च कसा भरून काढायचा? घरखर्च कसा भागवायचा? मुलांच्या शिक्षणासाठी पैसे कुठून आणायचे? असे प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभे राहतात. कैलास यांच्याकडे दोन एकर जमीन आहे, पण पाणी नसेल तर या जमिनीचा उपयोग तरी काय? विहीर असून पाणी नाही, मेहनत असून उत्पन्न नाही आणि पीक गेल्यानंतर पुढच्या हंगामाची तयारी करण्यासाठीही पैसा नाही. दुष्काळानं शेतकऱ्याची अवस्था अशी केलीय की, जगण्यासाठी शेती करायची की शेती वाचवण्यासाठी जगायचं, असा प्रश्न बळाराजाला पडतोय.


## Change In Name

My old Name is **AMOLKUMAR NAMDEVRAO NAWGHARE** Which now I am Changing as New Name **AMOL NAMDEVRAO NAWGHARE.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: S/O: Namdevrao Nawghare, Priydarshani Nagar, Kandhar, District :- Nanded, Maharashtra - 431714 Mo. No.7030033338**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## बॅग हरवली

माझी सुमित मारुतीराव मेहकर या नावाची बारावी पास कला शाखा टीसी व दहावी व बारावी चे मार्क मेमो व सनद असलेली बॅग मुखेड नांदेड प्रवास करीत असतांनाच हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा ही विनंती.

**– संपर्क पत्ता –**
**सुमित मारुतीराव मेहकर**
**महाकाली गल्ली, मुखेड**
**तालुका मुखेड,**
**जिल्हा नांदेड**
**मो.नं. ७६२०००१९४७**

## जाहिर प्रगटन

(नावातील बदला बाबत जाहिर प्रगटन)

मी शेखर पि. सुरेश मेगदे, रा. मराठगल्ली, मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड, ह.मु. समर्थ नगर, वडगाव शेरी, पुणे जि. पुणे या जाहिर प्रगटना द्वारे सर्व जनतेस कळवितो की,

माझे शालेय शिक्षण महात्मा गांधी विद्यालय मुदखेड येथे इयता 10 वी पर्यंतचे झाले असून मला शालेय प्रवेश देते वेळी माझे शाळा निर्गम रजिस्ट्रर वरती माझे नाव शेखर सुरेशराव मेगदे असे नमूद करण्यात आले आहे. त्यावरून माझे इयता दहावी चे सदन वरती वरील प्रमाणे नावाची नोंद झालेली आहे.

मी माझे आधार कार्ड व पॅन कार्ड नाव नोंदणी करते वेळी माझे नाव शेखर सुरेश मेगदे या नावाने नोंद केली आहे. त्यानुसार माझे आधार कार्ड व पॅन कार्ड हे शेखर सुरेश मेगदे या नावाने नोंद केलेली आहे.

हे की, दोन्ही नावातील व्यक्ती ही मीच असून माझे शासकिय कामासाठी माझे नाव शेखर सुरेश मेगदे हेच आहे व त्यानुसार मी पासपोर्ट कार्यालयीन कामासाठी मी हे जाहिर प्रगटन प्रकाशीत करत आहे.

करीता हे नावातील बदला बाबत जाहिर प्रगटन.

दिनांक : 24/10/2026

जाहिर प्रगटन देणार
शेखर पि. सुरेश मेगदे,
रा. मराठगल्ली, मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड,
ह.मु. समर्थ नगर, वडगाव शेरी,
पुणे जि. पुणे

## GYAN MATA VIDYA VIHAR

Near Airport, Kamtha Road, Nanded (MS)-431605
(CBSE Affiliation No. 1130194)
Email:gyanmata1988@gmail.com,Ph:8275052380

**Teachers / Staff Required**

Gyan Mata Vidya Vihar (CBSE), Near Airport, Nanded, requires qualified & trained English and Social Science teachers for classes 6 to 10 (Leave Vacancy), Interested candidates can mail the CV along with application to gyanmata1988@gmail.com by 26th October 2026. Salary will be negotiable. (Contact No. 8275052380)

**Principal**


## जाहीर समन्स.

**नांदेड येथील मे. न्यायाधीश, सहकार न्यायालय, नांदेड यांचे न्यायालयात.**

वादी:- समता विकास जिल्हा परिषद पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था,म.ता.नांदेड,जि.नांदेड मार्फत अधिकृत कर्मचारी

विरूध्द.

प्रतिवादी :- अमोल महारुद्रा कटकर,गटविकास कार्यालय,पंचायत समिती, ता.मुदखेड, जि.नांदेड-८००७४७४२८७.

| अ.क्र | सहकार केस नं. | प्रतीवादीचे नाव व पत्ता. | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख. |
|---|---|---|---|---|
| १. | सी.सी.एन/१८७/२०२६ | २. माणिक विश्वानाथ थोरात, गटविकास कार्यालय,पंचायत समिती,ता.मुदखेड,जि.नांदेड-७४४७६३८७३८२. ४.गटविकास अधिकारी, गटविकास कार्यालय, पंचायत समिती,ता.मुदखेड,जि.नांदेड. | रु.२,४०,८९५/- | दि.०६/११/२०२६ |

ज्याअर्थी, वादी यांनी आपले विरूध्द या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर समन्स / नोटीसव्दारे आपणास असे सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तीशः अथवा योग्यरितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या दाव्याच्या संदर्भातील सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल अशा अधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयामध्ये दि. ०६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आपल्या विरूध्द करण्यात आलेल्या दाव्याच्या संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी व पुरावे दाखल करण्यासाठी हजर राहावे. उपरोक्त उल्लेखित तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा निकाल आपले गैरहजेरीमध्ये करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर जाहीर समन्स हे मा. न्यायाधीश यांच्या दिनांक. १४/१०/२०२६ रोजीच्या हुकूमान्वये दिले आहे.

न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, नांदेड.

स्थळ :- न्यायाधीश, सहकार न्यायालय, नांदेड.
"श्री देवाशिष" कॉम्प्लेक्स, स्टेट बँक ऑफ इंडिया.डॉ. लेन समोर, नांदेड-४३१६०१

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## शिवाजीनगरमध्ये १.८० लाखांचा गांजा जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, दोघांना अटक

### नई आबादी भाजी मार्केटमध्ये छापा; ३ किलो ६०८ ग्रॅम गांजा हस्तगत



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नई आबादी परिसरात छापा टाकून ३ किलो ६०८ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या कारवाईत १ लाख ८० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांच्या पथकाने केली.

२४ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि रवी वाहुळे व त्यांचे पथक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, शिवाजीनगर हद्दीत काही इसम NDPS कायद्याच्या तरतुदींचा भंग करून गांजाची चोरटी विक्री करण्यासाठी तो स्वतःजवळ बाळगून आहेत. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्याकडून कायदेशीर कारवाईची परवानगी घेण्यात आली. त्यानंतर राजपत्रित अधिकारी, दोन शासकीय पंच आणि शासकीय फोटोग्राफर यांना सोबत घेऊन छापा टाकण्याचे नियोजन करण्यात आले. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राजेश पुरी यांनाही या कारवाईबाबत कळविण्यात आले होते.

दुपारच्या सुमारास शिवाजीनगर हद्दीतील नई आबादी येथील भाजी मार्केटमधील सिमेंट रोडवर सार्वजनिक ठिकाणी पथकाने छापा मारला. त्यावेळी एका नायलॉनच्या पोत्यासह शेख अनीस शेख सलीम (वय ३२, व्यवसाय ऑटोचालक/मजुरी, रा. दातार चौक, शिवाजीनगर, नांदेड) आणि सय्यद फेरोज सय्यद मुबारक (वय ४५, व्यवसाय भाजीविक्री/मजुरी, रा. दातार चौक, नई आबादी, शिवाजीनगर) यांना ताब्यात घेण्यात आले.

राजपत्रित अधिकारी व पंचांसमक्ष त्यांची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातील नायलॉनच्या पोत्यात व निळ्या कॅरीबॅगमध्ये उग्र वास येणारी पाने, बिया व फांद्या असलेला ३ किलो ६०८ ग्रॅम गांजा मिळून आला. फॉरेन्सिक टीमने तपासणी करून तो गांजाच असल्याची खात्री केली. जागीच इलेक्ट्रिक काट्यावर वजन करून प्रति किलो ५० हजार रुपये दराप्रमाणे एकूण १ लाख ८०. जार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी सपोनि रवी वाहुळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४५७/२०२६ कलम ८(क), २०(ब) II(ब), २९ NDPS कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## उसाला प्रतिटन ३५०० रुपये भावासाठी आज बाऱ्हाळी कारखान्यावर बैठक

### ऊस उत्पादक शेतकरी व तोड कामगारांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी साखर कारखान्याकडून ऊसाला कमी भाव दिला जात असल्याचा आरोप करत ऊसाला प्रतिटन ३५०० रुपये भाव द्यावा, ऊसतोड मजुरीत वाढ करावी, या मागण्यांसाठी रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता बाऱ्हाळी साखर कारखान्यावर बैठक आयोजित करण्यात आली आहे.

ऊस उत्पादक शेतकरी आणि ऊसतोड कामगारांच्या विविध मागण्यांसंदर्भात दि. ९ ऑक्टोबर रोजी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले होते. तहसील कार्यालयाने त्याच दिवशी कारखाना प्रशासनाला पत्र पाठवले होते. मात्र मागण्यांवर अद्याप निर्णय न झाल्याने आता थेट कारखान्यावर बैठक बोलावण्यात आली आहे.

या बैठकीत कारखाना प्रशासनाला विविध मागण्यांबाबत जाब विचारण्यात येणार असून, ऊस दराच्या प्रश्नावर पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील सर्व ऊस उत्पादक शेतकरी आणि ऊसतोड कामगारांनी उद्या दुपारी २ वाजता बाऱ्हाळी साखर कारखान्यावर उपस्थित राहावे, असे आवाहन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर, शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केले आहे.

## नांदेडमधील तीन सराईत गुन्हेगारांची 'एमपीडी' अंतर्गत हर्सूल कारागृहात रवानगी

### खंडणी, खुनाचा प्रयत्न, सशस्त्र दरोड्याच्या गुन्ह्यांची नोंद- एसपी डॉ. निलाभ रोहन यांच्या सूचनेनंतर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील सक्रिय व वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांची 'टू प्लस योजने' अंतर्गत माहिती संकलित करून त्यांच्याविरुद्ध प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यानुसार विविध पोलीस ठाण्यांकडून सराईत गुन्हेगारांविरुद्ध मोक्का तसेच झोपडपट्टीदादा अंतर्गत स्थानबद्धतेचे प्रस्ताव तयार करण्यात येत आहेत.

याच मोहिमेअंतर्गत तीन सराईत गुन्हेगारांना MPD कायद्यांतर्गत एका वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती कारागृह, हर्सूल येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे. स्थानबद्ध करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अनिकेत बालाजी सूर्यवंशी (वय २६, रा. पोचम्मा मंदिराजवळ, दत्तनगर, नांदेड), कृष्णा उर्फ कांद्या उत्तम सोनटक्के (वय १९, रा. सम्राट अशोक नगर, नांदेड) आणि शेख जुबेर शेख खदीर (वय २४, रा. मुदखेड रोड, वाजेगाव, ता. जि. नांदेड) यांचा समावेश आहे. पोलीस अभिलेखानुसार तिघांविरुद्ध खंडणी मागणे, खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीरपणे अग्निशस्त्र व घातक शस्त्रे बाळगणे व त्यांचा वापर करणे, सशस्त्र दरोडा, प्राणघातक हल्ला करून दरोडा, दरोड्याची पूर्वतयारी आणि गंभीर दुखापत करणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

यापूर्वी विविध प्रतिबंधात्मक कारवाया करूनही त्यांच्या वर्तनात सुधारणा न झाल्याने भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, नांदेड ग्रामीणचे पीआय अशोक जाधव आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राजेश पुरी यांनी MPD अंतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव पोलीस अधीक्षकांकडे सादर केला. प्रस्तावाची आवश्यक पूर्तता व कागदपत्रांची कार्यवाही स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले व प्रतिबंधक कार्यवाही सेलने पूर्ण केली.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी तिघांनाही एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याची शिफारस जिल्हादंडाधिकाऱ्यांकडे केली होती. त्यावरून जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी दि. २२ व २३ ऑक्टोबर रोजी तिघांना MPD अंतर्गत एक वर्षासाठी मध्यवर्ती कारागृह, हर्सूल येथे स्थानबद्ध करण्याचा आदेश पारित केला. आदेशाची अंमलबजावणी करून तिघांनाही ताब्यात घेऊन कारागृहात दाखल करण्यात आले आहे.

## डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीमुळे मराठवाड्याची तहान भागली –आ. श्रीजया चव्हाण

### पिंपळगावात 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत विद्यार्थ्यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** यावर्षी महाराष्ट्र दुष्काळाने होरपळत असून, सर्वांनी पाणी अत्यंत जपून वापरणे गरजेचे आहे. दिवंगत नेते कै. शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीमुळे आणि इसापूर- जायकवाडीसारख्या मोठ्या प्रकल्पामुळेच आज तहानलेल्या मराठवाड्याची तहान भागू शकली, असे गौरवोद्गार आमदार ॲड. श्रीजया चव्हाण यांनी पिंपळगाव महादेव येथे काढले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक सेवाकार्याला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने देशभरात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नांदेड येथील जयप्रकाश ग्राम कल्याण संस्था संचलित 'निर्धार व्यसनमुक्ती केंद्रा'च्या वतीने पिंपळगाव येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना आ. ॲड. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल राजनंदिनी दुधमल आणि महेश व्यंकटी कल्याणकर यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन स्वतःमधील कौशल्यांचा विकास करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष राम अय्यर यांनी व्यसनमुक्ती केंद्राच्या कार्याची माहिती देत पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळाचा आढावा घेतला.

भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाषराव कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास प्रतिष्ठित नागरिक सारिका कल्याणकर, प्रवीण देशमुख, सुरेश देशमुख, अजय कल्याणकर, वसंतराव कल्याणकर, नागोराव भांगे, बालाजी गव्हाणे, माधवराव कल्याणकर, मुख्याध्यापक इंगोले, अहंकारे यांच्यासह शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांनी 'निर्धार व्यसनमुक्ती केंद्रा'स सदिच्छा भेट देऊन तेथे राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले. सोहळ्याचे सूत्रसंचालन भगवान साळवे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीकांत निळेकर, संकेत अय्यर, वंदना सावते, आनंदराव शिंदे, रामगिरवार आणि सचेतन अय्यर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अवैध धंद्यांवर 'मास रेड'; एका दिवसात २४ गुन्हे, २५ आरोपींवर कारवाई, ४२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी दि. २३ ऑक्टोबर रोजी नांदेड जिल्हाभरात विशेष 'मास रेड' मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वयाने शहरी व ग्रामीण भागातील संशयित ठिकाणांवर एकाच दिवशी धाडसत्र राबवून दारूबंदी, मटका, जुगार तसेच इतर बेकायदेशीर व्यवसायांवर प्रभावी कारवाई केली. या विशेष मोहिमेत एकूण २४ गुन्हे दाखल करण्यात आले असून २५ आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. तसेच एकूण ४२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ठाणे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली.

जिल्हा पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा विशेष मोहिमा यापुढेही सातत्याने राबविणार असून अवैध व्यवसायांबाबत माहिती असल्यास नागरिकांनी निर्भयपणे स्थानिक पोलीस ठाण्यास किंवा डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आनंदराव बेंद्रीकर यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – तालुक्यातील बेंद्री येथील ज्येष्ठ नागरिक आनंदराव माधवराव पाटील बेंद्रीकर यांचे शनिवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी दुपारी २ च्या सुमारास राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने बेंद्री परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

आनंदराव पाटील बेंद्रीकर यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. बालाजी पाटील बेंद्रीकर व आत्माराम पाटील बेंद्रीकर यांचे ते वडील होत.

## ऑटो व्यवहारातील ३० हजार रुपये देण्यास टाळाटाळ केल्याने एकाची चिठ्ठी लिहून आत्महत्या

### दोघांविरुद्ध ॲट्रॉसिटीसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा भोकर पोलिसात गुन्हा दाखल



**भोकर (प्रतिनिधी)–** भोकर तालुक्यातील दिवशी येथील तुळशीराम लक्ष्मण कदम (वय ४५) यांनी ऑटो व्यवहारातील पैसे देण्यास टाळाटाळ केल्याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याप्रकरणी दोन व्यक्तींविरुद्ध ॲट्रॉसिटीसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा भोकर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

मयत तुळशीराम लक्ष्मण कदम यांनी काही दिवसांपूर्वी स्वतःचा ऑटो विकला होता. या व्यवहारातील उर्वरित ३० हजार रुपये वारंवार मागूनही पैसे देण्यास टाळाटाळ करून उलट जिवे मारण्याची धमकी देत असे. या त्रासाला कंटाळून तुळशीराम कदम यांनी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी सदरील दोन आरोपींची नावे चिठ्ठीमध्ये लिहून ठेवली होती. त्या चिठ्ठीमध्ये माझा ऑटो १ लाख रुपयाला विकला आहे. उर्वरित ३० हजार रुपये पंधरा दिवसांत देण्याचे ठरले होते. पाच महिने लोटून गेले असतानाही पैसे न देता उडवाउडवीची भाषा करीत आहेत. ज्याने काय झाले ते करून घे यासह मारण्याची धमकी देत आहेत असे लिहून होते. मयत तुळशीराम कदम यांच्या पत्नी करुणाबाई तुळशीराम कदम यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे मैनेदीन शेख आणि राहुल माधव सोनकांबळे दोघेही रा. भोकर यांच्याविरुद्ध भोकर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम १०८, ३५१(२), ३५१(३), ३(५) तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कलम 3(1) (r),3(1) (s),3(2)(v) अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भाग्यनगरात मंगळसूत्र हिसकावले, वजिराबादमध्ये कार फोडून लॅपटॉप लंपास तर भोकरमध्ये ७ लाखांचे सोयाबीन जाळले

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात गेल्या २४ तासांत चोरी, जबरी चोरी आणि मालमत्तेचे नुकसान केल्याच्या तीन वेगवेगळ्या घटना घडल्या आहेत. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस तपास करत आहेत.

दि. २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३५ वाजता तिरुमला नगर, नांदेड येथे दोन अनोळखी इसमांनी संगनमत करून मोटारसायकलवर येऊन फिर्यादी गायत्री कैलास रेनेवाड (वय ३८, रा. फरांदे नगर, नांदेड) यांच्या गळ्यातील ८३ हजार ९८३ रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण हिसकावून नेले.

या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६१३/२०२६ कलम ३०४ (२), ३(५) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोउपनि विनोद देशमुख करत आहेत.

**वजिराबाद– कारची काच फोडून लॅपटॉप चोरी**

दि. २३ ऑक्टोबर रोजी दुपारी १.३६ वाजता कर्मवीर हॉस्पिटलजवळ, नांदेड येथे अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या गाडीच्या डाव्या बाजूची काच फोडून आत ठेवलेला डेल कंपनीचा लॅपटॉप, चार्जर व इतर साहित्य असा एकूण ५३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

फिर्यादी श्रीनिवास उपलपवार (वय ४०, रा. उमरेड रोड, नागपूर) यांच्या तक्रारीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५३१/२०२६ कलम ३०३(२), ३२४(२) BNS अन्वये गुन्हा दाखल झाला असून तपास पोहेकॉ येमेकर करत आहेत.

**भोकर – ७ लाखांचे सोयाबीन जाळले**

दि. २३ ऑक्टोबर रोजी रात्री एक ते २.४३ वाजेच्या दरम्यान मौजे लामकानी शेतशिवार, ता. भोकर येथे फिर्यादीच्या शेतात ढिग करून ठेवलेले ७ लाख रुपये किमतीचे सोयाबीन पीक अज्ञात इसमाने आग लावून जाळून नुकसान केले. फिर्यादी मारोती माधवराव सूर्यवंशी (वय २२, रा. लामकानी, ता. भोकर) यांच्या फिर्यादीवरून भोकर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५७२/२०२६ कलम ३२६(फ) BNS अन्वये गुन्हा दाखल असून तपास पोलीस हवालदार कंधारे करीत आहेत.

## नांदेड लोहमार्ग पोलिसांची दमदार कामगिरी; दोन गुन्ह्यांची उकल, १० तोळे सोने जप्त, एकाला अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील लोहमार्ग पोलिसांनी दोन वेगवेगळ्या चोरीच्या गुन्ह्यांची उकल करीत १० तोळे सोने आणि रोख रकमेसह एकूण ८ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका आरोपीला अटक केली आहे.

फिर्यादी अजंतराव राजाराम कोल्ही (वय ७७, रा. डॉ. ए. एस. राव नगर, हैदराबाद) हे दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री २ ते २.३० वाजेच्या सुमारास ट्रेन क्र. १७०६४ अजंता एक्सप्रेसच्या एसी कोचमधून प्रवास करीत असताना त्यांच्या झोपेचा फायदा घेऊन अज्ञात आरोपीने त्यांची हँडबॅग चोरली. त्यात ६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण (किंमत ४ लाख रुपये), २० ग्रॅम वजनाची सोन्याची व काळ्या मण्यांची चैन (किंमत २ लाख रुपये) आणि ६ हजार रुपये रोख असा एकूण ६ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल होता. याप्रकरणी रेल्वे पोलीस ठाणे नांदेड येथे गु.र.नं. ६५७/२०२६ कलम ३०५ (सी) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पोउपनि देशमुख यांच्याकडे देण्यात आला होता.

फिर्यादी संध्या रुकेश कातलापल्ली (वय २५, रा. कुल्ली लाईन, कोत्तागुडम, जि. भद्राद्री कोत्तागुडम, तेलंगणा) या दि. ३१ जुलै २०२६ रोजी ट्रेन क्र. १७६८७ मराठवाडा एक्सप्रेसच्या जनरल कोचमधून नागरसोल ते मुदखेड असा कुटुंबासह प्रवास करीत होत्या. सदर ट्रेन मानवत रोड येथे रात्री ८.४५ वाजता आली असता गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील २० ग्रॅम वजनाचे १ लाख ५० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र चोरून नेले.

याप्रकरणी दि. १ ऑगस्ट रोजी रेल्वे पोलीस ठाणे नांदेड येथे गु.र.नं. ५१७/२०२६ कलम ३०५ (सी) BNS अन्वये गुन्हा दाखल होऊन तपास पोहेकॉ वसीम शेख यांच्याकडे देण्यात आला होता.

## सुनील अनंतवार यांची अखिल भारतीय कलवार-कलाल- कलार महासभेच्या राष्ट्रीय सचिवपदी निवड



**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील सामाजिक कार्यकर्ते सुनील प्रभाकर अनंतवार यांची अखिल भारतीय कलवार, कलाल, कलार महासभा, दिल्लीच्या राष्ट्रीय सचिवपदी निवड करण्यात आली आहे.

महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष मनीष राय आणि महासचिव किशोर भगत यांनी ही निवड केली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय सल्लागार डॉ. हनमा गौड म्हात्रे, मराठवाडा प्रभारी डॉ. संजय तेलंग आणि बाबाराव देवलवार यांनी त्यांच्या नावाची शिफारस केली होती.

सुनील अनंतवार यांनी सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, दिव्यांग सेवा व समाजप्रबोधन अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय उपक्रम राबविले आहेत. समाजातील हजारो बांधवांना कमी खर्चात दर्जेदार रुग्णसेवा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे.

## किनवट-सिरमेटी रस्त्यावर सागवान तस्करी

### अंधाराचा फायदा घेत आरोपी फरार



**किनवट (प्रतिनिधी)–** येथील वनविभागाच्या फिरत्या पथकाने दि. २४ रोजी पहाटे ३ ते ३.३० वाजेच्या सुमारास किनवट-सिरमेटी रस्त्यावरून सागवान लाकडांची तस्करी करणाऱ्या ५ तस्करांचा पाठलाग केला. पथक येत असल्याचे दिसताच अंधाराचा फायदा घेत पाचही तस्कर फरार झाले. कारवाईत पथकाने लाकडे जप्त केली आहेत.

वनविभागाचे फिरते पथक किनवट - सिरमेटी रस्त्यावर दि. २४ च्या रात्री गस्त घालत असताना पाच जण डोक्यावर सागी लाकडाचे नग घेऊन किनवटच्या दिशेने येताना वनपथकाच्या निदर्शनास आले. पथकाने त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपी घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाले. या कारवाईत वनविभागाने ०.२०९३ घनमीटर लाकूड, एकूण पाच सागी नग असा ४ हजार ४१८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई नांदेडच्या उपवनसंरक्षक मनीषा पाटील, सहायक वनसंरक्षक किरण चव्हाण आणि किनवटचे वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) धीरज मदने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. फिरत्या पथकाचे वनपरिक्षेत्र अधिकारी एन. एम. केंद्रे, वनपाल वाय. एस. बोखारे, एस. एम. यादव, वनरक्षक रवी दांडेगावकर, ओम शिंदे, बालाजी भुरके, चांगुणा बुरकुले, वनमजूर भाऊसिंग जाधव आणि वाहनचालक बाळकृष्ण आवले यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com